मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२७ ■ बुधवार, १४ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514







**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने पनवेल विभाग सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निवडणुकीच्या अनुषंगाने ब्रीफिंग केले.खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत नवीन पनवेल सेक्टर 5 ए येथील गुरुद्वारा येथे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निवडणुकीच्या अनुषंगाने ब्रीफिंग केले.यावेळी खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, 1 पोनि, 8 अधिकारी,74 पोलीस अमलदार, 114 होमगार्ड असे उपस्थित होते.

# 'पतंग मुक्त संक्रांत' आणि 'पक्षी संवर्धन' मोहिमेत केंब्रिज इंग्लिश स्कूलचा आदर्श उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड:** मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर, पक्षी संवर्धनाचा सामाजिक संदेश देण्यासाठी सिल्लोड येथील केंब्रिज इंग्लिश स्कूलने यंदा आपला वार्षिक 'काईट फेस्टिवल' रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या उपक्रमातून शाळेने पर्यावरण स्नेही संक्रांत साजरी करण्याचा एक नवा आदर्श जिल्ह्यासमोर ठेवला असून, विद्यार्थ्यांच्या हस्ते पक्षी उपयोगी अशा 'मोह' वृक्षांचे रोपण करून एक अनोखा उपक्रम राबवला.

गेल्या १५ वर्षांपासून 'वनजागर' या प्रबोधन मोहिमेद्वारे जनजागृती करणारे अभिनव प्रतिष्ठानचे वन्यजीव व वृक्ष संवर्धक डॉ. संतोष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, पतंग उडवण्याच्या छंदापायी वापरात येणाऱ्या मांजामुळे दरवर्षी लाखो पक्षी जखमी होतात किंवा मृत्युमुखी पडतात. तसेच नायलॉन आणि मेटल कोटेड मांजामुळे मानवी जीवितालाही मोठा धोका निर्माण



झाला आहे. हा धोका टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी पतंग न उडवण्याची शपथ घेतली.

केंब्रिज इंग्लिश स्कूलने यावर्षी स्वतःचा पतंग महोत्सव रद्द करून निसर्ग संवर्धनासाठी पाऊल उचलले आहे. याप्रसंगी डॉ. संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या परिसरात 'मोह' वृक्षाची लागवड करण्यात आली. मोहाचे झाड हे जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हळद्या, बुलबुल, तांबट यांसारखे १४ प्रकारचे पक्षी या झाडाची फुले खातात, तर राखी धनेश या झाडाच्या ढोलीत प्रजनन करतो आणि फळे खाऊन नैसर्गिक बीज प्रसार करतो. निसर्गचक्र टिकवण्यासाठी मोह वृक्षाचे संवर्धन करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

या अभिनव उपक्रमाबद्दल बोलताना मुख्याध्यापक संतोष पाटणी म्हणाले की, "विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण रक्षणाची मूल्ये रुजवण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला असून, भविष्यातही शाळा अशा समाजोपयोगी उपक्रमात अग्रेसर राहील."

या कार्यक्रमाप्रसंगी जॉय सर, अंटो, सचिन मदणी, ऋषिका कटारिया, मनिषा तायडे, अश्विनी जाधव, क्षम ता अग्रवाल, आयेशा मॅडम, पूजा, लक्ष्मी, वर्षा मॅडम यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन वर्षातही भाजीपाला महागच!

**दैनिक युवक आधार**

**रत्नागिरी, प्रतिनिधी :** यंदा पावसाने मुक्काम वाढवल्याने व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पीक हातातून गेले. दरम्यान, जानेवारी महिना उजडला तरी हिवाळ्यात भाज्यांचे दर वाढलेलेच आहेत. कोणतीही भाज्या २० ते ३० रूपयेच्या खाली पावकिलो मिळत आहे. कांदा, बटाट्याचे दर स्थिर आहेत. हिरवी मिरची, गवार, पावटा, फरसबी, मटार, कांदापात महागले आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत असून असल्या महागाईत खायचे काय, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे.



महागाईमुळे महिलांच्या किचनमधील आर्थिक गणित बिघडले आहे.

पावसाळ्यात यंदा पावसाने चांगली हजेरी लावली होती. सर्वच ठिकाणी पिके बहरली होती. मात्र अतिवृष्टीमुळे पश्चिम महाराष्ट्र, विर्दभ, कोकण, मराठवाडा येथील पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे ऐन हिवाळयात भाजीपाल्यांची आवक कमी झाली. त्यामुळे दर वाढलेलेच आहेत. आता नवीन वर्षात भाजीपाला वाढले मात्र दरही वाढलेले आहे. हिवाळा संपत आला असून बाजारात फळे, विविध प्रकारची पालेभाज्या आलेल्या आहेत. कांदा, बटाटा, मटार, गाजर, पावटाशेंगा, वांगी, मुळा यासह विविध भाज्या विक्री होत आहेत.मटार १०० ते १२० रूपये दराने विकत आहेत. तर कांदापात ३० रूपयास एक, वांगी ७० रूपये किलो, टोमॅटो ८० रूपये किलो, मेथी, पालक, शेपू या २० ते ३० रूपये जोडीने विक्री सुरू आहे.

# मनमाड, नांदगाव रेल्वे स्थानकात प्रवाशांना मिळणार अधिक सुविधा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक, प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील मनमाड हे महत्वाचे रेल्वे जंक्शन स्टेशन आहे. मनमाड रेल्वे स्थानक आणि मनमाडजवळील नांदगाव रेल्वे स्थानकांमध्ये सध्या कामांना वेग आला आहे. या कामांचा रेल्वे प्रवाशांना लाभ होणार असून रेल्वे स्थानकात प्रवेश करताच त्यांना आरामदायी आणि प्रसन्नतेची अनुभूती मिळणार आहे.

कोणत्याही रेल्वे स्थानकात मोठ्या प्रमाणावर अस्वस्छता अधिक असते. त्यामुळे रेल्वे स्थानकात अधिक वेळ बसणे किंवा उभे राहणे प्रवाशांसाठी कठीण जाते. फलाटांवर पडलेली घाणही अनेक स्थानकांमध्ये लवकर स्वच्छ केली जात नाही. या सर्व पार्श्वभूमीवर, नाशिक जिल्ह्यातील मनमाड आणि नांदगाव या रेल्वे स्थानकांमध्ये काही कामे करण्यात येत आहेत. रेल्वे प्रवास सुरक्षित व्हावा यासाठीही उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे.

मनमाड आणि नांदगाव या रेल्वे स्थानकांमध्ये सुरु असलेल्या कामांची भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांनी पाहणी केली.

नाशिक, मनमाड विभागात ट्रेन क्रमांक ११११३ च्या फुटप्लेटची निरीक्षणाद्वारे पाहणी केली. या दरम्यान लोको पायलट आणि सहायक लोको पायलट यांची वाहन चालन पद्धती, सिग्नल पालन तसेच कर्मचाऱ्यांची सतर्कता यांचा आढावा



घेण्यात आला. सुरक्षितता नियमांचे काटेकोर पालन, दक्षता आणि कार्यशिस्त राखून सुरक्षित व वेळेत गाड्यांचे संचालन करण्यावर विशेष भर देण्यात आला.

विभागीय रेल्वे व्यवस्थापक तसेच विविध शाखांचे वरिष्ठ अधिकारी यांनी अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांची प्रगती पाहण्यासाठी मनमाड स्थानकाची पाहणी केली. या तपासणीमध्ये कामांची गुणवत्ता, वेळापत्रक तसेच प्रवासी-केंद्रित सुधारणा जसे की सुविधा, सुलभता, स्वच्छता आणि स्थानकाचा एकूण सौंदर्यात्मक विकास यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. प्रवाशांना अधिक चांगला अनुभव देण्यासाठी कामे वेळेत पूर्ण करताना सुरक्षा व गुणवत्ता मानकांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले.

विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी मनमाड-भुसावळ विभागात विंडो ट्रेलिंग निरीक्षणही केले. या दरम्यान सुरू असलेली विकासकामे, ट्रॅकची दुरुस्ती, स्थानकांची स्थिती, ओएचई (विद्युत वाहिनी), लेव्हल क्रॉसिंग तसेच इतर महत्त्वाच्या सुरक्षा पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

# ठाणे महापालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशिक्षण संस्थेत विशेष व्याख्यानाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**ठाणे, प्रतिनिधी :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) परीक्षेला बसणाऱ्या प्रशिक्षणार्थी व विद्यार्थ्यांसाठी ठाणे महानगरपालिकेच्या वतीने संचलित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था येथे "DAF Form Filling & Preference of Services" या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार नुकतेच विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे माजी विद्यार्थी व सध्या ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागात कार्यरत असलेले सनदी अधिकारी डॉ. नितीन



जावळे (IAS – २००३) प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

या विशेष व्याख्यानात ठाणे व मुंबई शहरातील यूपीएससी परीक्षार्थींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभलेल्या या कार्यक्रमात डॉ. नितीन जावळे यांनी UPSC DAF फॉर्म म्हणजे काय, तो कसा भरावा, फॉर्म सबमिट केल्यानंतर बदल करता येतात का, सेवा प्राधान्य (Service Preference) कसे द्यावे, त्यात बदल कधी व कसा शक्य आहे, याबाबत सविस्तर व सुस्पष्ट मार्गदर्शन केले.याशिवाय कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता, सकारात्मक दृष्टिकोन, अभ्यासाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, संयम, प्रामाणिकपणा, सातत्य व आत्मविश्वास यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच प्रश्नोत्तराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला व त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

या संवादात्मक सत्रामुळे प्रशिक्षणार्थींमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी ठाणे महापालिकेचे उपआयुक्त सचिन सांगळे तसेच संचालक महादेव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मिसिंग लिंकचा खर्च ७५०० कोटींच्या वर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर खोपोली ते कुसगाव अशी १९.८० किमीची नवीन मार्गिका अर्थात मिसिंग लिंक बांधण्याच्या कामाला २०१९ मध्ये सुरुवात करण्यात आली आहे. ही मार्गिका आतापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र या प्रकल्पाच्या कामास मोठी विलंब झाला असून परिणामी आता प्रकल्प खर्चात मोठी वाढ झाली आहे. मिसिंग लिकच्या खर्चात १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे ६८५० कोटींचा खर्च ७५०० कोटीच्या घरात जाणार आहे. मिसिंग लिंकचे काम प्रचंड आव्हानात्मक असल्याने कामास विलंब होत असल्याचे एमएसआरडीसीचे म्हणणे आहे.

एमएसआरडीसीच्या मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गामुळे मुंबई ते पुणे अंतर अडीच तासात पार करता येत आहे. मात्र आता हा द्रुतगती मार्ग वाढत्या वाहनसंख्येला सामावून घेण्यास अपुरा पडू लागला आहे. त्यामुळे महामार्गावर गर्दीच्या वेळेस मोठी वाहतूक कोंडी असते. अशात येत्या काळात वाहनसंख्या आणखी वाढणार असल्याने



एमएसआरडीसीने मिसिंग लिंक प्रकल्प हाती घेतला आहे. खोपोली ते कुसगाव अशी १९.८० किमीच्या मिसिंग लिंकच्या कामाला दोन टप्प्यात सुरुवात करण्यात आली होती.

याविषयी एमएसआरडीसीकडे विचारणा केली असता प्रकल्प खर्च वाढ झाल्याच्या वृत्तास दुजोरा दिला आहे. अद्याप प्रकल्प पूर्ण व्हायचा असून मार्चपर्यंत प्रकल्प पूर्ण होईल. त्यानंतर नेमकी किती खर्च या प्रकल्पासाठी झाला हे स्पष्ट होईल. मात्र आतापर्यंत अंदाजे १० टक्के खर्च वाढ झाल्याचा अंदाज असल्याचेही अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे ६८५० कोटींचा खर्च आता ७५०० कोटींवर गेला असल्याचे म्हटले जात आहे.

# पुण्यापासून कोल्हापूर ते ठाण्यापासून रायगडपर्यंतच्या उद्योगांची आंतरराष्ट्रीय भरारी!

**दैनिक युवक आधार**

**पुणे, प्रतिनिधी :**

राज्यातील पुण्यापासून कोल्हापूर, मुंबई, ठाणे, रायगडपर्यंतच्या उद्योगांनी आंतरराष्ट्रीय भरारी घेतली आहे. त्यांनी ॲमेझॉनच्या माध्यमातून कोट्यवधी डॉलरची निर्यात केली आहे. यातून त्यांनी राज्यासह देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले आहे. याचबरोबर राज्याच्या कानाकोपऱ्यातील उद्योगांना यामुळे गती मिळण्यासोबत आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळत आहे.ॲमेझॉनच्या माध्यमातून राज्यातून निर्यात करणारी प्रमुख शहरे मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, रायगड ही ठरली आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर राज्यातील सर्वाधिक मागणी असलेल्या उत्पादनांमध्ये गृहोपयोगी वस्तू, खेळणी, आरोग्य,




वैयक्तिक निगा, किचन आणि कार्यालयीन उत्पादने यांचा समावेश आहे. राज्यातील विक्रेत्यांसाठी अमेरिका, ब्रिटन, कॅनडा, संयुक्त अरब अमिराती, जर्मनी या प्रमुख बाजारपेठा आहेत.सध्या, ॲमेझॉन ग्लोबल सेलिंगमध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांतील २२ हजारांहून अधिक निर्यातदारांचा समावेश आहे. या उपक्रमाला देशभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. आता त्यात २०० हून अधिक भारतीय शहरांमधील विक्रेत्यांचा समावेश झाला आहे. यामुळे रायगडसारख्या छोट्या शहरांतील निर्यातदारांना २०२४ मध्ये २२ दशलक्ष डॉलरची विक्री करणे शक्य झाले आहे. ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग अमेरिका, ब्रिटन, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कॅनडा, मेक्सिको, जर्मनी, इटली, फ्रान्स, स्पेन, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर अशा १८ हून अधिक जागतिक बाजारपेठांमधील कोट्यवधी ग्राहकांना आपल्या उत्पादनाची विक्री करून जागतिक ब्रँड तयार करण्यास भारतीय विक्रेत्यांना सक्षम करते.

**एकूण २० अब्ज डॉलर निर्यात**

ॲमेझॉन ग्लोबल सेलिंग कार्यक्रमात २०१८ ते २०२५ या काळात २ लाखांहून अधिक भारतीय निर्यातदारांना एकूण २० अब्ज डॉलरची ई-कॉमर्स निर्यात केली आहे. ॲमेझॉनने २०२५ पर्यंत भारतातून एकूण १० अब्ज डॉलरची ई-कॉमर्स निर्यात साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते.

# कुलगुरूंकडून प्रसिद्ध हिंदी साहित्यिकाचा अपमान; चक्क व्यासपीठावरूनच खाली उतरवले

**दैनिक युवक आधार**

**नागपूर, प्रतिनिधी :** छत्तीसगडच्या बिलासपूर येथील गुरू घासीदास केंद्रीय विद्यापीठात मागील आठवड्यात झालेला राष्ट्रीय परिसंवाद वादग्रस्त ठरला. नागपूरचे लेखक आणि कथाकार मनोज रूपडा यांनी कुलगुरू प्रो. आलोक कुमार चक्रवाल यांना अवांतर न बोलता मुख्य विषयावर लक्ष केंद्रित करण्याची विनंती केली. यावर कुलगुरू चांगलेच संतापले आणि त्यांनी लेखकाचा सूर अयोग्य असल्याचे सांगत रूपडा यांना चक्क व्यासपीठावरून निघून जाण्यास सांगितले. रूपडा यांच्यासह अन्य साहित्यिकांनीही कार्यक्रमाचा निषेध केला.

साहित्य अकादमी, नवी दिल्ली आणि गुरू घासीदास केंद्रीय विद्यापीठातील हिंदी विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'समकालीन हिंदी कथाकथन : बदलत्या जीवनाचे संदर्भ' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. उद्घाटन सत्रादरम्यान कुलगुरु प्रो. चक्रवाल यांनी अध्यक्षीय भाषणात त्यांच्या जीवनातील अनुभव सांगितले. तुम्हाला माझ्या भाषणाचा कंटाळा तर येत नाही ना?, असा प्रश्न त्यांनी रूपडा यांना विचारला. यावर रूपडा यांनी कुलगुरूंना अवांतर न बोलता मुख्य विषयावर भाषण द्यावे, अशी विनंती केली.

यावरून कुलगुरु संतापले व त्यांनी रूपडा यांना व्यासपीठावरून निघून जाण्यास सांगितले. कुलगुरूंच्या या व्यवहाराचा निषेध करत रूपडा आणि इतर काही साहित्यिक सभागृहातून बाहेर पडले. कार्यक्रम संपल्यानंतर केंद्रीय विद्यापीठात हा विषय चर्चेत आला आहे. या घटनेवर शैक्षणिक आणि साहित्यिक वर्तुळात वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटत आहे.

**काय म्हणाले कुलगुरू?**

रूपडा यांच्या विनंतीनंतर कुलगुरू चक्रवाल म्हणाले, तुम्ही एक उत्तम कथाकार आणि अभ्यासक आहात, असे दिसते. मी मुद्याकडेच येत आहे. मी विषयाबाहेर काहीही बोलत नाही. पण, कदाचित तुमच्यात कुलगुरूंशी बोलण्याची बुद्धी नाही.

तुम्हाला कोणी आमंत्रित केले? यांना पुन्हा आमंत्रित करू नका. मी तुम्हाला जाहीरपणे सांगत आहे की, कोणाशी कसे बोलावे याचा शिष्टाचार रूपडा यांना नाही. रूपडा यांना आत्ताच येथून निघून जाण्यास सांगा.

## खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे इम्रान मच्छीवाले उपनगराध्यक्षपदी बिनविरोध

### मुस्लिम समाजात आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**योगेश चौदंते :** मुदखेड नगर परिषदेच्या राजकीय इतिहासात एक महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय नोंदवला गेला आहे. माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक इम्रान मच्छीवाले यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

मुदखेड पालिकेच्या इतिहासात प्रथमच मुस्लिम समाजातील व्यक्तीस उपनगराध्यक्षपदाची संधी देण्यात आल्याने शहरात विशेषतः मुस्लिम समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.आज मंगळवार, १३ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वाजता मुदखेड नगर परिषदेच्या सभागृहात लोकनियुक्त नगराध्यक्षा विश्रांती माधव कदम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा पार पडली. या सभेला मुख्याधिकारी दळवी यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. उपनगराध्यक्ष पदासाठी इम्रान मच्छीवाले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले.

माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव



चव्हाण आणि आमदार श्रीजया चव्हाण यांनी नेहमीच सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन समन्यायाची भूमिका घेतली आहे. भाजपच्या एकूण १४ नगरसेवकांपैकी केवळ तीन नगरसेवक मुस्लिम समाजाचे असतानाही इम्रान मच्छीवाले यांच्यावर विश्वास टाकून त्यांना उपनगराध्यक्षपद देण्यात आले, हे विशेष उल्लेखनीय आहे.या निर्णयामुळे केवळ मुदखेड शहरातच नव्हे तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यात एक सकारात्मक संदेश गेला आहे. अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात स्थान मिळाल्याच्या आनंदात मुस्लिम बांधवांनी फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोष साजरा केला.

ही निवड म्हणजे मुदखेडच्या राजकीय आणि सामाजिक सलोख्याचा नवा अध्याय असून खासदार अशोकराव चव्हाण व आमदार श्रीजया चव्हाण यांच्यावर मुस्लिम समाजाकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पालोदमध्ये 'भगव्या' चैतन्याचा जागर

## शिवभक्तांच्या अलोट गर्दीत 'जिजाऊ जन्मोत्सव' व 'महाआरती' संपन्न

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** तालुक्यातील पालोद येथील गणपती चौकात राजमाता जिजाऊ जन्मोत्सवाचे औचित्य साधून शौर्य आणि अस्मितेचे प्रतीक असलेल्या भव्य भगव्या ध्वजाचा ध्वजारोहण सोहळा व महाआरती अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. धानोरा येथील श्री काशी विश्वेश्वर महादेव मंदिर संस्थानचे पीठाधीश बालयोगी श्री सर्वानंद सरस्वती महाराज यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित हजारो शिवभक्तांच्या 'जय भवानी, जय शिवाजी'च्या गगनभेदी जयघोषाने संपूर्ण पालोद नगरी भगवामय झाली होती.

राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर यांच्या मार्गदर्शनाखाली







आयोजित या सोहळ्यात राजमाता जिजाऊंना अभिवादन करण्यासाठी भव्य महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे पालोद गावातील महिलांचा लाभलेला अभूतपूर्व आणि विक्रमी सहभाग. राजमाता जिजाऊंच्या संस्कारांचा वारसा जपत शेकडो माता-भगिनींनी या सोहळ्याला हजेरी लावून महाआरतीमध्ये सहभाग नोंदवला. यावेळी डॉ. राहुल पालोदकर, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक आबा पाटील जंजाळ, भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष शुभम पाटील अन्वीकर, सरपंच नासेर पठाण, उपसरपंच मच्छिंद्र पालोदकर, रमेश पालोदकर, सुनील लांडगे,गजानन जंजाळ, केशव समिंद्रे, तुषार दांडगे यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना भाजपा युवा तालुकाध्यक्ष शुभम पाटील अन्वीकर यांनी आपल्या रोखठोक आणि प्रखर शैलीत हिंदुत्वाची भूमिका मांडली. ते म्हणाले की, "भगवा ध्वज केवळ कापडाचा तुकडा नसून ती आपल्या संस्कृतीची, बलिदानाची आणि स्वाभिमानाची अस्मिता आहे. छत्रपती शिवरायांचे विचार आणि जिजाऊंचे संस्कार जोपासणे हेच आजच्या तरुणांचे आद्य कर्तव्य आहे." महिलांच्या मोठ्या संख्येने असलेल्या उपस्थितीचा गौरव करत, जिजाऊंचे संस्कारच खऱ्या अर्थाने समाज घडवत असल्याचे त्यांनी नमूद केले. अन्वीकर यांच्या या ओघवत्या आणि धारदार भाषणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

या सोहळ्यासाठी पालोद परिसरातील अबालवृद्धांसह ग्रामस्थ, महिला आणि शिवभक्तांची अलोट गर्दी पाहायला मिळाली. कार्यक्रमाचे अत्यंत सूक्ष्म आणि नेटके नियोजन डॉ. राहुल दादा पालोदकर मित्र मंडळाने केले होते. अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने पालोद गावाच्या एकजुटीची आणि गौरवशाली परंपरेची मोहोर संपूर्ण तालुक्यावर उमटवली आहे.

भक्ती, शक्ती आणि विचारांचा त्रिवेणी संगम असलेल्या या सोहळ्याची चर्चा सध्या सर्वत्र रंगली आहे.

# आनंद बाजारातून पिरकोनच्या विद्यार्थ्यांनी घेतला शिक्षणासोबत व्यवहारज्ञानाचा धडा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिरकोन येथे विद्यार्थ्यांना शिक्षणातून व्यवहारज्ञान मिळावे या उद्देशाने “आनंद बाजार” हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न घेता प्रत्यक्ष व्यवहार, खरेदी-विक्री, नफा-तोटा, मोजमाप, संवादकौशल्य यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

या आनंद बाजारात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार






केलेले व आपल्या पालकांच्या मदतीने शेतमालावर आधारित विविध पदार्थ व वस्तू विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. यामध्ये पुरणपोळी, तांदळाचे पोळे, लह्यांची भेळ, चणाभेळ, गुलाबजाम, चहा, चायनिज भेल, गाजर हलवा, चायनिज पकोडे, 'खाऊचे दुकान, पास्ता, पावभाजी, ब्रेडरोल,(कप) पेस्ट्री केक, शेवगा शेंगा, 'वालांच्या शेंगा पालेभाज्या, नुडल्स, मोमोज आणि पॉपकॉर्न इत्यादी वस्तूंची दुकाने मांडण्यात आली.या आकर्षक चविष्ट स्टॉल्समुळे संपूर्ण शाळा परिसर बाजारपेठेसारखा गजबजून गेला होता.

या उपक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मा. सौ. प्रियंका नितेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष मा. सौ. सुप्रिया कुमार पाटील, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ पूनम पाटील, शाळेतील शिक्षकवृंद, पालकवर्ग, सर्व शाळा व्यवस्थापन सदस्य व ग्रामस्थ, शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी ग्राहकांशी संवाद साधत दर ठरवणे, पैशांची देवाणघेवाण, हिशोब ठेवणे यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे आर्थिक साक्षरता, आत्मविश्वास आणि संघभावना यांचा विकास झाल्याचे पालकांनीही कौतुक केले.“आनंद बाजार”सारखे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त असून शिक्षण अधिक रंजक व जीवनोपयोगी बनवतात, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांची व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** हिंदवी स्वराज्य संकल्पिका राजमाता राष्ट्रमाता जिजाउ यांची तसेच नवयुवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमांसाठी मुली जिजाऊ यांच्या यांच्या वेशभुषेत आल्या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन रिया शिंदे या विद्यार्थिनीने केले तर आभार प्रदर्शन अनुष्का पौळ या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमासाठी अंगणवाडी सेविका तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. अंकुश शिंदे, तसेच मुख्याध्यापक श्री.झोडपे सर, तसेच सर्व शिक्षक श्री. लोकरे सर, श्री. फड सर, श्री. राठोड सर, श्री. मोमीन सर आणि सौ.शिंदे मॅडम उपस्थित होते.

## 'रक्तदान हेच जीवनदान'; आसडी गावात जनजागृतीसाठी 'जीवनदान महाकुंभ' रॅली उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** अनंत विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्रचार्य महाराज आणि प. पू. कानिफनाथ महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने, आसडी ( ता.सिल्लोड ) सेवा केंद्राच्या वतीने गावात 'जीवनदान महाकुंभ' जनजागृती मोहिमेचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. येत्या १६ जानेवारी (शुक्रवार) रोजी पालोद येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिराच्या पार्श्वभूमीवर, ग्रामस्थांमध्ये जागृती करण्यासाठी ही प्रभात फेरी काढण्यात आली होती.

या उपक्रमात जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक साळवे सर, शिक्षक वृंद आणि शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. 'रक्तदान करा-जीवन वाचवा', 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' अशा घोषणांनी संपूर्ण गाव परिसर



निनादला होता. विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन ग्रामस्थांना या महाकुंभात सहभागी होण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, रक्ताचा एक थेंब कोणाचे तरी आयुष्य वाचवू शकतो. त्यामुळे गावातील युवक, महिला मंडळ आणि भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने पालोद येथील शिबिरात उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले.

## रक्त सांडलेल्या रस्त्यांवर मदतीचा हात !अपघातग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी मोठी जुई येथे रंगणार 'सीएचए आधार चषक'

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** औद्योगिक विकासाच्या वेगात उरण मधील रस्त्यांवर अपघातांचे सत्र थांबवण्याचे नाव घेत नाही. या भीषण अपघातामध्ये कोणी आपला कर्ता पुरुष गमावला आहे तर कोणी कायमचे अपंगत्व स्वीकारले आहे. अशा अपघातग्रस्त कुटुंबाच्या आयुष्याला उभारी देण्यासाठी आणि निधी संकलनासाठी न्हावा शेवा येथील' सीएचए आधार सामाजिक संस्था' पुढे सरसावली आहे येथे रविवार दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी मोठी जुई येथील 'मी मराठी 'मैदानात सीएचए आधार चषक या भव्य क्रिकेट सामन्यांचे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

उरणे हे शहर वेगाने विकसित होणारे औद्योगिक शहर असले तरी ,अवजड वाहतुकीमुळे येथे अपघातांचे प्रमाण सर्वाधिक आहे .या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबाला आणि जखमी झालेल्या सीएचए बांधवांना आर्थिक आधार मिळावा , हा या स्पर्धेचा मुख्य हेतू आहे .क्रिकेटच्या बॅटमधून निघणारी प्रत्येक धाव ही पीडित कुटुंबाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी एक मोलाची मदत ठरणार आहे.

सी एच ए आधार सामाजिक संस्था केवळ सण उत्सव साजरे करत नाही तर



प्रत्येक संकटात सक्रिय होऊन मदत करते. यावर्षीच्या सी एच ए चषकासाठी संस्थेच्या विभागातील सर्व गावाध्यक्ष आणि एकूण ५९६ सभासद अहोरात्र झटत आहेत. सकाळी साडेनऊ ते संध्याकाळी पाच या वेळात रंगणाऱ्या या सामन्यांच्या माध्यमातून मोठा निधी संकलित करून तो गरजूंना सुपुर्द केला जाणार आहे. आम्ही केवळ क्रिकेट खेळण्यासाठी एकत्र येत नाहीत तर अपघातात उध्वस्त झालेल्या संसाराला आधार देण्यासाठी मैदानात उतरत आहोत,या विधायक कार्यासाठी उरण मधील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सढळ हाताने मदत करावी असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. मोठी जूईचे 'मी मराठी मैदान, १८ जानेवारीला केवळ क्रिकेट क्रिकेटचा जल्लोषाचे नाही,तर माणुसकीच्या दर्शनाचे साक्षीदार ठरेल .वेगाच्या स्पर्धेत हरवलेल्या जीवांच्या स्मृतीला उजाळा देत आणि त्यांच्या पाठीशी उभे राहत सीएचए आधार सामाजिक संस्था, सामाजिक बांधिलकीचा एक नवा आदर्श उरणमध्ये निर्माण करत आहे.

# शिवभक्त प्रथमेश पुंडे यांच्या कार्याचे महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री आ. मकरंद आबा पाटील यांनी केले कौतुक

**दैनिक युवक आधार**

**रुपेश राजे प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मदत व पुनर्वसन मंत्री श्री.मकरंद आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला.छत्रपतींचा इतिहास जनसामान्य लोकांमध्ये पोहचविण्यासाठी प्रथमेश भास्कर पुंडे यांची किल्ले प्रतापगड दर्शन मोहिम उत्साहात संपन्न.जयघोषाने प्रतापगड दुमदुमला.140 पेक्षा जास्त शिवभक्तांनी सर केला प्रतापगड किल्ला.नवी मुंबई येथील लहान मूल,महिला,पुरुष यांनी घेतले प्रतापगडाचे दर्शन.आमच्या राजाचे पराक्रम,आयुष्य,वीरांचे बलिदान याच गडकिल्ल्यांनी बघितले आहेत.गडकिल्ले हेच खरे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक.माझे अस्तित्व छत्रपती शिवाजी महाराज आणि आमच्या पूर्वजांनी दिलेल्या बलिदानामुळे आहे.छत्रपती शिवाजी




महाराज हे सर्वकालीन सर्वश्रेष्ठ राज्यकर्ते होते. शिवाजी महाराजांचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्म परायणतेचे होते. राज्यकर्ते म्हणून ते सर्वश्रेष्ठ तर होतेच ; पण त्याचबरोबर ते व्यक्ती म्हणून सुद्धा आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठच आहेत.शिवरायांच्या ठायी शौर्य, पराक्रम, युक्तिमत्ता, साहस, स्वाभिमान, उद्यमशीलता, निःपक्षपातीपणा, कुशलता, विवेकशीलता, गुणग्राहकता, निर्णयक्षम, कल्पकता असे विविध गुण, जीवनमूल्ये आणि जीवन कौशल्ये होती. चारित्र्याची उत्तम जडणघडण होण्यासाठी मानवाला या महत्त्वपूर्ण जीवनकौशल्यांची आवश्यकता आहे.

स्वराज्यावर अफजलखानाच्या रूपाने मोठे संकट आले तेव्हा जिजामाता म्हणतात, ‘‘शिवबा या मातेने आपला पुत्र गमावला तरी बेहत्तर पण स्वाभिमानाने लढा.’’आज या प्रकाराची पिढी आणि आई वडील मुलांना या राष्ट्राच्या कल्याणासाठी,राष्ट्र रक्षणासाठी समाजासाठी तयार करतील तरच भविष्य असेल असे मला वाटते.

स्वराज्यातील गडकिल्ले हे पराक्रमाची,संघर्षाची प्रतिके आणि ऊर्जास्रोत आहेत.युनेस्कोच्या यादीतील किल्ल्यांच्या भेटीतील 4 मोहिमेतील किल्ले प्रतापगड आहे अशी माहिती प्रथमेश भास्कर पुंडे यांनी दिली. महाराजांचे विचार जनसामान्यांत रुजावे यातून राष्ट्रप्रथम पिढी उभी रहावी हेच प्रमुख उदिष्ट.मराठी शाहीर वैभव घरत आणि सायली भोसले यांचा मराठमोळा पोवाडा व शाहिरी गीतांचा कार्यक्रम वाई याठिकाणी आयोजित केला होता यासाठी वाईतील युवा नेते ओमकार जाधव व सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.तसेच श्री.उदय पोळ यांनी किल्ले प्रतापगड ,ऐतिहासिक वास्तू,मंदिर,घाट बद्दल दोन दिवस संगती राहून माहिती दिली.

किल्ले प्रतापगड मोहिमेतील लहान मुल,महिला - पुरुष यांचा उत्साह बघून आम्हाला अजून बळ मिळालं. या किल्ल्यावर सर्वांनी तहान,भुकेला प्राधान्य न देता फक्त आणि फक्त किल्ले दर्शनासाठी महत्व देऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति असलेली श्रद्धा प्रेम याला प्राधान्य देऊन या मोहिमेचे महत्व पटवून दिले.

तसेचयावर्षीचा लहान शिवभक्त म्हणून कु.माही अगरवाल व महिला शिवभक्त म्हणून मनिषा पाटिल तर पुरुष शिवभक्त म्हणून पॅडी पाटील यांची निवड झाली.मोहिम यशस्वी झाली यासाठी प्रथमेश भास्कर पुंडे आणि सर्व सहकाऱ्यांचे कौतुक आणि अभिनंदन करण्यात येत आहे.

## रायसीना इंग्लिश स्कूल सुशी येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी भीमराव गावडे :** केसुला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित रायसीना इंग्लिश स्कूल सुशी तालुका गेवराई जिल्हा बीड या शाळेमध्ये दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहामध्ये साजरी करण्यात आली, विद्यार्थ्यांनी जिजाऊंची वेशभूषा करून आपली मनोगत व्यक्त केली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विजय राठोड होते प्रथमता माँ साहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत गाऊन उपस्थितांची




मने जिंकली. काही विद्यार्थिनी राष्ट्रमाता जिजाऊ यांचा जीवन परिचय आपल्या भाषणातून मांडला तर काही विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विषयी माहिती दिली. यावेळी मंचावर आकाश सर ,अनिल सर, आशा मिस,वैशाली मिस ,रेणुका मिस, नीता मिस ,शुभांगी मिस स्वप्निल माने, यांची उपस्थिती होती

अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. राठोड सर यांनी जिजामातांनी ज्या प्रकारे शिवरायांना शिकवण देऊन स्वराज्य निर्माण केले. अशाच पद्धतीने प्रत्येक मातांनी आपल्या पाल्यांना चांगल्या गोष्टी कोणत्या आणि वाईट कोणत्या याची शिकवण देणे गरजेचे आहे. सध्याच्या युगात मोबाईलचे वेड लहान मुलांपासून ते मोठ्या माणसांना लागलेला आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून लांब राहावे असे आवाहन केले कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी कुमारी अंकिता पौळ व तेजल पौळ यांनी केले,तर आभार प्रदर्शन शाळेचे शिक्षक अनिल सर यांनी केले.

# राष्ट्रभक्ती व व्यक्तिमत्त्व घडवणारे शिक्षण हवे - विजय जोशी

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार :** शिक्षण हे समाजभिमुख व व्यक्तित्व घडविणारे असायला पाहिजे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय हवे.राष्ट्रभक्त नागरिक घडवण्याचे काम भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्कार केंद्रात होते. असे मत स्वामी विवेकानंद आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त(१२जानेवारी)आयोजित आंतरशालेय स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी विजय जोशी यांनी व्यक्त केले.व्यासपीठावर हरिभाऊ चौधरी, उपेंद्र बेल्लूरकर,मु.अ. नामदेव एकशिंगे ,आंतरशालेय स्पर्धाप्रमुख अनिल कौसडीकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना विजय जोशी म्हणाले की,महापुरुषांच्या नावावर हे विद्यालय चालते त्या महापुरुषाच्या विचाराचा जागर आणि त्यांना अभिप्रेत असेलेला नागरिक याच भावनेतून विवेकानंद प्राथमिक विद्यालयात घेण्यात आलेल्या आंतर शालेय स्पर्धेतून दिसून येत आहे.विद्यादाना बरोबर समाजाची बांधिलकी कशी जपावी याचीही माहिती विद्यार्थ्यांना या शाळेत देण्यात येते. आगामी काळात विवेकानंद विद्यालयाचा नावलौकिक वाढवा अशी मनीषा त्यांनी व्यक्त केली.प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.आंतरशालेय स्पर्धेत बालवाडीसाठी घेण्यात आलेल्या वेशभूषा स्पर्धेत श्रीदा महाजन (प्रथम),आराध्या थोंबाळ (द्वितीय), श्रवण शिंदे,आरव कुलकर्णी ,आरणा सुरवसे (तृतीय).इयत्ता १ली चित्ररंगभरण स्पर्धेत आर्यन शिंदे(प्रथम,विवेकानंद विद्यालय),आरुषी धबडगे (द्वितीय,के. बा. विद्यालय)ओजस्वी ठुबे(विवेकानंद विद्यालय).इयत्ता २री चित्ररंगभरण स्पर्धेत अनिका वाडकर (प्रथम,विवेकानंद विद्यालय)सिद्धी घुमरे (द्वितीय, विवेकानंद विद्यालय)नियती मुसळे(तृतीय, के.बा. विद्यालय) इयत्ता तिसरी चित्ररंगभरण स्पर्धेत



आद्या खजिने (प्रथम, प्रिन्स इंग्लिश स्कुल) तन्वी अवचार(द्वितीय,विवेकानंद विद्यालय) साक्षी राठोड (तृतीय, विवेकानंद विद्यालय) इयत्ता ४थी सामान्यज्ञान (स्कॉलरशिप ) आधारीत स्पर्धेत समृद्धी भुतडा(प्रथम ,नूतन विद्यालय)अंकित आघाव(द्वितीय, विवेकानंद विद्यालय)वंशिका आकलोड (तृतीय, विवेकानंद विद्यालय)इयत्ता ५वी सामान्यज्ञान (स्कॉलरशिप)आधारित स्पर्धेत काव्या मरेवार(प्रथम,विवेकानंद विद्यालय) शुभ्रा मुळी (द्वितीय,विवेकानंद विद्यालय) श्रेयश मुपडे(तृतीय, विवेकानंद विद्यालय) मधुर कुलकर्णी(तृतीय,विवेकानंद विद्यालय) इयत्ता ६वी निबंध स्पर्धेत समृद्धी काष्टे (प्रथम, विवेकानंद विद्यालय)आर्या कुलकर्णी(द्वितीय,नूतन विद्यालय)आरुष ताठे (तृतीय,विवेकानंद विद्यालय) इयत्ता ७ वी सामान्यज्ञान (स्कॉलरशिप)आधारित स्पर्धेत सान्वी शितळे (प्रथम,नूतन विद्यालय)तन्मय भुतडा(द्वितीय,नूतन विद्यालय)अरमान सय्यद (तृतीय, के.बा. विद्यालय) इयत्ता ८वी सामान्यज्ञान (स्कॉलरशिप)आधारित स्पर्धेत अनुजा जवळकर(प्रथम,नूतन कन्या शाळा)संचिता होगे(द्वितीय,विवेकानंद विद्यालय)कुंदन पाटील(तृतीय,के.बा. विद्यालय)प्रतीक्षा चिंचोलकर(तृतीय, नूतन कन्या शाळा) इयत्ता आठवीसाठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली त्यात कल्याणी काष्टे (प्रथम,विवेकानंद विद्यालय)दिव्या आढे(द्वितीय,विवेकानंद विद्यालय) सिद्धी गजमल(तृतीय,नूतन कन्या शाळा) वेशभूषा स्पर्धेचे परीक्षण उज्वला धर्माधिकारी,चित्ररंगभरण स्पर्धेचे परीक्षण पांडुरंग पाटणकर ,निबंध स्पर्धेचे जयश्री सोन्नेकर यांनी तर वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण जि. प.प्रशाला राजा येथील मुख्याध्यापक सुखदेव घुले व जि. प. प्रशाला म्हाळसापूर येथील सहशिक्षिका आम्रपाली खाजेकर यांनी केले.


विवेकानंद प्राथमिक विद्यालयात घेण्यात आलेल्या आंतरशालेय स्पर्धेत सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला.वक्तृत्व स्पर्धेचे सूत्रसंचालन आश्विनी पावसे व बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन विजय चौधरी यांनी केले.प्रास्ताविक नामदेव एकशिंगे यांनी केले. यादी वाचन दीपाली पवार यांनी केले.आभार अनिल कौसडीकर यांनी मानले.सोनाली जोशी यांनी पद्य सादर केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# वनी चौफुली–अंबिका नगर परिसर अंधारात

## स्ट्रीट लाईट त्वरित दुरुस्त करण्याची नागरिकांची ठाम मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) :** पिंपळगाव बसवंत नगरपरिषदेच्या हद्दीतील वनी चौफुली ते अंबिका नगर परिसरात स्ट्रीट लाईट बंद असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी संपूर्ण परिसर अंधारात बुडत असून अपघात, चोरी तसेच असुरक्षिततेचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. या गंभीर बाबीकडे नगरपरिषदेसह संबंधित टोल प्रशासनानेही त्वरित लक्ष देऊन बंद असलेले स्ट्रीट लाईट तत्काळ दुरुस्त करावेत, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे.

पिंपळगाव बसवंत ग्रामपंचायतीच्या काळात तत्कालीन सरपंच भास्करराव बनकर यांच्या नेतृत्वाखाली साफसफाई, पाणीपुरवठा व स्ट्रीट लाईट यांसारख्या मूलभूत सुविधा नियमित व सुरळीत सुरू



होत्या. नागरिकांच्या दैनंदिन गरजांकडे संवेदनशीलतेने लक्ष दिले जात होते, त्यामुळे कोणतीही मोठी समस्या निर्माण होत नव्हती, असे नागरिकांनी सांगितले.मात्र पिंपळगाव बसवंत नगरपरिषद लागू झाल्यापासून साफसफाई, पाणीपुरवठा तसेच स्ट्रीट लाईट यांसारख्या मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. वारंवार तक्रारी व लेखी निवेदने देऊनही वनी चौफुली–अंबिका नगर परिसरातील स्ट्रीट लाईट अद्याप सुरू करण्यात आलेले नाहीत, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या संदर्भात नगरपरिषद तसेच टोल प्रशासनाला अनेक वेळा लेखी निवेदन देण्यात आले असूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामीनागरिकांच्या संयमाचा बांध फुटत असून, प्रशासनाच्या उदासीन भूमिकेविरोधात आता थेट आंदोलन छेडण्याची वेळ आली असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले.यावेळी पिंपळगाव बसवंत अंबिका नगर येथील सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय धाडीवाल, भारत गायकवाड, विलास वायकंडे, मनोज शेवरे, विश्वनाथ खराटे यांच्यासह अनेक नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते. नगरपरिषद व टोल प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन स्ट्रीट लाईट दुरुस्त न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# गाव विकासासाठी बाह्य राज्यांचा अभ्यास दौरा; गरुडेश्वर पिंपळगावचे सरपंच बाळू डबाळे यांची मध्यप्रदेश–राजस्थान–पंजाब–गुजरात भेट”

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी-कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) :** महाराष्ट्र राज्यातील नाशिक जिल्ह्यातील गरुडेश्वर पिंपळगावचे सरपंच बाळू डबाळे व त्यांचे सहकारी सध्या बाह्य राज्यांच्या अभ्यास दौऱ्यावर असून, या दौऱ्याअंतर्गत मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब व गुजरात या राज्यांना भेटी देण्यात येत आहेत. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त योजनांचा, नाविन्यपूर्ण उपक्रमांचा व प्रशासनाच्या कार्यपद्धतींचा अभ्यास करणे हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.

या अभ्यास दौऱ्यादरम्यान विविध राज्यांतील ग्रामविकास मॉडेल्स, स्वच्छता, पाणीपुरवठा, रोजगारनिर्मिती, पर्यटन विकास तसेच सामाजिक उपक्रमांची माहिती घेतली जात आहे. यासोबतच



गावातील कार्यकर्त्यांच्या सहभागातून स्थानिक संस्कृती, परंपरा व खाद्यपदार्थांचा (वनभोजनाचा) अनुभवही घेतला जात असून, एकात्मतेचे व सहकार्याचे वातावरण निर्माण होत आहे.

राजस्थान दौऱ्यातील तीव्र थंडीचे वातावरण प्रकर्षाने जाणवल्याचे सरपंच बाळू डबाळे यांनी सांगितले. तसेच राजस्थानमधील प्रसिद्ध धार्मिक स्थळ खाटू श्यामजी येथे “सारे का सहारा, खाटू श्याम हमारा” या संकल्पनेचे दर्शन घेतल्याने आध्यात्मिक समाधान लाभल्याचे त्यांनी नमूद केले.

या अभ्यास दौऱ्याच्या पुढील टप्प्यात गुजरात राज्यातील द्वारका, जुनागढ, सोरटी सोमनाथ आदी धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेट देण्याचे नियोजन असून, या ठिकाणांवरील विकासकामांचा व पर्यटन व्यवस्थापनाचा सखोल अभ्यास करून त्यातील उपयुक्त बाबी गरुडेश्वर पिंपळगावच्या विकासासाठी राबविण्यात येणार असल्याची माहिती सरपंच बाळू डबाळे यांनी दिली आहे.

**अमरावती महानगरपालिका निवडणूक 2025-26 : झोन क्र.1 ते 7 येथे ई.व्ही.एम. सिलींग प्रक्रियेला सुरुवात**

# मा.मुख्य निवडणूक निरीक्षक डॉ. भरत एन. बस्तेवाड, मा.निवडणूक निरीक्षक अनिल खंडागळे यांची पाहनी

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादक :** अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी प्रशासनामार्फत आवश्यक ती सर्व तयारी करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने झोन क्र.1 ते 7 येथे स्थापन करण्यात आलेल्या सुरक्षा कक्षामध्ये आज दिनांक 8 जानेवारी 2026 रोजी सकाळी 10.00 वाजेपासून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (ई.व्ही.एम.) मधील बॅलेट युनिट (BU) व कंट्रोल युनिट (CU) यांची सिलींग प्रक्रिया अधिकृतरित्या सुरु करण्यात आली.



सदर सिलींग प्रक्रिया ही भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अत्यंत काटेकोरपणे राबविण्यात आली. ई.व्ही.एम. यंत्रांची सुरक्षितता, गोपनीयता तसेच निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास अबाधित राहावा, या दृष्टीने सर्व नियम व प्रक्रिया पाळण्यात आल्या.

या महत्वपूर्ण प्रसंगी मा. डॉ. भरत एन. बस्तेवाड (भा.प्र.से.), आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), नागपूर तथा मुख्य निवडणूक निरीक्षक व मा.अनिल खंडागळे अप्पर जिल्हाधिकारी तथा निवडणूक निरीक्षक यांनी सुरक्षा कक्षास भेट देऊन प्रत्यक्ष सिलींग प्रक्रियेची पाहणी केली. त्यांनी ई.व्ही.एम. सिलींग प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित व नियमानुसार होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच उपस्थित अधिकाऱ्यांना निवडणूक प्रक्रिया कोणत्याही त्रुटीशिवाय पार पाडण्यासाठी दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी संबंधित झोनचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी, कर्मचारी वर्ग, सुरक्षा यंत्रणा तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. सुरक्षा कक्षामध्ये सीसीटीव्ही यंत्रणा, 24 तास पोलीस बंदोबस्त व प्रवेश-नियंत्रण व्यवस्था ठेवण्यात आली असून ई.व्ही.एम. यंत्रांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात आली आहे.

अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ही मुक्त, निष्पक्ष व शांततेच्या वातावरणात पार पडावी, यासाठी प्रशासनामार्फत सर्व स्तरांवर आवश्यक ती खबरदारी घेण्यात येत आहे. नागरिकांनी निर्भयपणे मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने यावेळी करण्यात आले.

# महाविकास आघाडीच्या सभेत महायुतीवर केली टीका

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीच्या वतीने प्रभाग क्रमांक १० मधील उमेदवारांच्या प्रचारासाठी कळंबोली येथे 12 जानेवारी रोजी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, प्रभाग क्रमांक १० मध्ये महाविकास आघाडीने आपली ताकद पणाला लावली आहे. या प्रभागातील गोपाळ भगत, प्रज्ञा दीपक पाटील, संतोष धनाजी जाधव, शितल अंकुश माळवे या महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य जाहीर सभा संपन्न झाली. यावेळी सांगोळा येथील आमदार बाबासाहेब देशमुख, माजी आमदार जयंत पाटील, बाळाराम पाटील, महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने



हजर होते. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शेतकरी कामगार पक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), मनसे आणि काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्र येत भाजपसमोर तगडे आव्हान उभे केले आहे. जरी काही जागा धनाच्या जीवावर बिनविरोध केल्या असल्या तरी सत्तेत नक्कीच बदल होईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. या सभेमध्ये पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था आणि वाढीव मालमत्ता कराच्या मुद्द्यांवरून सत्ताधारी भाजपवर शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी जोरदार टीका केली.

## प्रामाणिक कर्तव्यदक्ष आणि पक्षनिष्ठ उमेदवाराला निवडून आणा-पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त समितीचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत प्रामाणिक कर्तव्यदक्ष आणि पक्षनिष्ठ उमेदवाराला निवडून आणण्याचे आवाहन पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त समितीने केले. बारा जानेवारी रोजी पनवेलमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत समितीने याची माहिती दिली. यावेळी माजी आयएएस अधिकारी सुधाकर पाटील, एडवोकेट विजय गडगे, संजय घरत, प्राजक्ता गोवारी यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिका होऊन दहा वर्षे झाली तरी देखील अनेक समस्या कायम आहेत. अन्यायकारक मालमत्ता कराचा प्रश्न सुटलेला नाही, तसेच दुबार मालमत्ता



कराचा बोजा कायम आहे. पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त समितीतर्फे अनेकदा रस्त्यावर आणि महानगरपालिका कार्यालयासमोर आंदोलने, मोर्चे, पायी आंदोलने करण्यात आली. अद्यापही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव देण्यात आले नाही. केंद्रात आणि राज्यात सत्ता असतानाही नाव देण्यास विलंब केला जात आहे. नागरिकांवर अन्यायकारक कर लादला जात आहे. कळंबोली स्टील मार्केट मधील धनाढ्य व्यापारांचा 368 कोटी रुपयांचा एलबीटी कर माफ करून तो बोजा भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्त आणि शहरी भागातील जनतेच्या डोक्यावर चढवला जात असल्याचा आरोप या पत्रकार परिषदेत करण्यात आला. त्यामुळे 15 जानेवारी रोजी आपल्यावर झालेले अन्याय डोक्यात ठेवूनच मतदानाला बाहेर पडा आणि प्रामाणिक, कर्तव्यदक्ष, पक्षनिष्ठ उमेदवाराला निवडून आणा असे आवाहन पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त समितीने केले आहे.

# रुग्णसेवक शिवा सावके यांच्या कार्याचा सत्यपाल महाराज यांच्या हस्ते गौरव

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील :** रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून सतत गोरगरिब सामान्य माणसाचा सेवेसाठी २४ तास तत्पर असणारे रुग्णसेवक तथा आरोग्यसेनेचे जिल्हाप्रमुख शिवा सावके यांचा तऱ्हाळा येथील श्री सत्यपाल यांनी कीर्तना दरम्यान सत्कार केला,

किर्तन सुरू असताना त्यांनी रक्तदान व रुग्णसेवा करावी असे आव्हाहन केले व उपस्थित पैकी कोणी या सेवेत कार्यरत आहेका असा प्रश्न केला असता लोकांनी शिवाभाऊ सावके असे नाव सांगितले, त्याचवेळी महाराज यांनी कीर्तनात उपस्थित असलेले शिवा सावके यांना मंचावर निमंत्रित केले व सत्यपाल महाराज यांनी शिवा सावके यांचा सत्कार केला त्यासह एक पुस्तक भेट दिले त्यासह त्यांच्या रुग्णसेवेचे कार्यात मदत म्हणून ५०० रुपये सुद्धा भेट दिले.

सदर सत्कार स्वीकारताना शिवा सावके भावूक झाले त्यासह त्यांनी सुद्धा आपण




यापेक्षा अधिक जोमाने रुग्णसेवेच काम करू, गोरगरीब रुग्णाचा सेवेत राहू असे आश्वास्त केले, त्यासह उपस्थित महिलापैकी रक्तदान करणाऱ्या महिलांचा सुद्धा सत्कार केला.

श्री. शंभूशेष महाराज यात्रा महोत्सव दरम्यान सदर किर्तन आयोजन केले होते प्रमुख उपस्थित म्हणून शालिकराम पाटील राऊत, दौलतभाऊ इंगोले, किशोरभाऊ देशमुख, रवि पाटील राऊत, रणजितभाऊ गावंडे, जोशी महाराज,संस्थानचे विश्वस्त सागर पाटील म्हैसने, चेतन पाटील येवले, समाधान येवले, सुनील मिसाळ, डॉ.पवन आगळे त्यासह समस्त भाविक भक्तगण उपस्थित होते.

## अपक्ष उमेदवार अमोल नालकोल यांचा शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** प्रभाग क्रमांक 16 ड मधील अपक्ष उमेदवार अमोल नालकोल यांनी 11 जानेवारी रोजी शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला आणि शेकाप महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. त्यांचे शेतकरी कामगार पक्षात जाहीर स्वागत करण्यात आले. पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीला वेग आला आहे. प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. त्यामुळे ठीकठिकाणी पक्ष प्रवेश केले जात आहेत. अपक्ष उमेदवार म्हणून लढत असलेले अमोल नालकोळ यांनी आज शेतकरी कामगार पक्षात पक्ष प्रवेश केला. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळाराम पाटील, उमेदवार बबन विश्वकर्मा, युवा कार्यकर्ते राजेश घरत यांच्यासह अनेकजण उपस्थित होते.

# राष्ट्रीय महामार्गावरील वृक्षतोडीला नागरिकांचा ठाम विरोध!

## नगर परिषद व संबंधित यंत्रणांना निवेदन देत पर्यावरणप्रेमींचा इशारा – नियमबाह्य झाडतोड थांबवा, अन्यथा आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडेवाशीम जिल्हा प्रतिनिधी :** शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गालगत तसेच नगर परिषद हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी असलेल्या सदर वृक्षांची तोड करण्याच्या हालचालींविरोधात तीव्र जनआक्रोश निर्माण झाला असून, पर्यावरणप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांनी एकत्र येत नगर परिषद वाशिमच्या मुख्याधिकाऱ्यांना दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी सविस्तर लेखी निवेदन सादर केले आहे. या निवेदनात महाराष्ट्र वृक्ष संवर्धन व संरक्षण अधिनियम 1975, तसेच पर्यावरण संरक्षणाच्या कायदेशीर तरतुदींचा स्पष्ट उल्लेख करून कोणतीही बेकायदेशीर व नियमबाह्य वृक्षतोड तात्काळ थांबवावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन रोहन पाटील सिरसाट (अध्यक्ष, क्लायमेट कम्पोस्ट अँड ग्रीन असोसिएशन, वाशिम तथा अध्यक्ष, अमरावती झोन) व महेंद्र पांडुरंग जावळे (प्रा. संयोजक, महाराष्ट्र पर्यावरण पॅनल, वाशिम तसेच कन्व्हिनर व अध्यक्ष, अखिल भारतीय मानव संघटना, वाशिम) यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला असलेली झाडे ही केवळ सौंदर्याची बाब नसून वाहनचालकांच्या सुरक्षिततेसाठी, प्रदूषण नियंत्रणासाठी, तापमान संतुलनासाठी व जैवविविधतेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

निवेदनात पुढे स्पष्ट करण्यात आले आहे की,

कोणतेही झाड तोडण्यापूर्वी सक्षम प्राधिकरणाची लेखी परवानगी, सार्वजनिक नोटीस, पर्यावरणीय मूल्यांकन व कायदेशीर



प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र संबंधित ठिकाणी नगर परिषद व इतर संबंधित यंत्रणांनी ही प्रक्रिया पूर्ण न करता वृक्षतोडीची तयारी सुरू केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. अशा प्रकारे झाडे तोडल्यास पावसाच्या पाण्याचा निचरा बिघडणे, अपघातांची शक्यता वाढणे, उष्णतेत वाढ होणे तसेच पक्षी व सजीवांचे अधिवास नष्ट होण्याचा गंभीर धोका निर्माण होणार असल्याचे निवेदनात नमूद आहे.

निवेदनात करण्यात आलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत –

राष्ट्रीय महामार्ग व नगर परिषद हद्दीतील कोणतीही वृक्षतोड तात्काळ थांबवावी,वृक्षतोडीऐवजी वृक्षसंवर्धन व वैज्ञानिक छाटणीचा पर्याय स्वीकारावा,कायद्याचे उल्लंघन करून झाडे तोडणाऱ्या संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी,तसेच भविष्यात कोणताही निर्णय घेण्यापूर्वी नागरिकांचा विश्वासात घेऊन पारदर्शक प्रक्रिया राबवावी.या निवेदनास स्वप्नील संतोषराव वाघ (ग्रामपंचायत सदस्य, सुंदर वाडिका), सुभाषराव तानाराव देशमुख (समाजसेवक तथा पोलीस मित्र), दशरथ पुंडलिक इंगळे (प्रा. दशरथ बूट हाऊस), अक्षय विठ्ठल चव्हाण (कल्पना बेकरी वर्क्स, वाशिम), गणेश उर्फ बाळू मधुकर बेरड (सावता सेना जिल्हाध्यक्ष, वाशिम), विजय नामदेव गोरे (समाजसेवक), सुनील शंकरराव निवांदकर (पेट ठेकेदार), संदीप शंकर पवार (साई बिल्डर्स तथा ठेकेदार), सचिन सुभाष सिरसाठ (ठेकेदार, वाशिम), संजय हुद्दार वेगन (शेतकरी), मुरलीधर सोपनराव बाळबांधे (शिक्षक), राजानंद चंद्रकांत टाले (जिल्हा संघटक, अखिल भारतीय मराठा महासंघ, वाशिम) आणि मोहन सुनीलकुमार भोजवानी (सामाजिक कार्यकर्ते) यांच्यासह अनेक नागरिकांच्या सह्या आहेत.प्रशासनाने या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन योग्य निर्णय न घेतल्यास राष्ट्रीय महामार्ग व नगर परिषद विरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अर्जदारांनी दिला आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी देणे सहन केले जाणार नाही, असा ठाम संदेश या निवेदनातून देण्यात आला आहे.

# पनवेलमधील दाक्षिणात्य समाजाचा भाजप महायुतीला भक्कम पाठिंबा

## संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वावर विश्वास, प्रचारसभेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** "अण्णां बहार का नाही, अण्णां ओर अण्णांके दाक्षिणात्य समाज के सभी नागरीक कर्मभूमी से ऋणी पनवेलकर हे " या भावनेतून पनवेलमधील दाक्षिणात्य समाजाने एकसंघ होत भाजप महायुतीच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला. दाक्षिणात्य समाजाचे संवेदनशील व प्रभावी नेतृत्व म्हणून ओळख असलेले माजी स्थायी समिती अध्यक्ष व माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली न्यु पनवेल येथील भव्य मैदानात प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते.

प्रभाग १४ ते २० मधील दाक्षिणात्य समाज मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित राहून आपला विश्वास व्यक्त केला. यावेळी अनेक मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या दूरदृष्टीपूर्ण आणि सर्वसमावेशक विकासकार्याचे मनापासून कौतुक केले. स्थानिक–परप्रांतीय असा भेदभाव न करता सर्व समाजाला आपलेसे करणारे नेतृत्व म्हणून ठाकूर कुटुंबाची ओळख असल्याचे वक्त्यांनी अधोरेखित केले.

सभेत बोलताना माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी पनवेल नगरपरिषद ते महापालिका हा आधुनिक प्रवास संघर्षमय पण अभ्यासपूर्ण असल्याचे सांगितले. या प्रवासात नागरिकांना मूलभूत सुविधांचा मुबलक पुरवठा करण्यात यश आले असून उर्वरित विकासकामांचा पुढचा टप्पा भाजप महायुतीच्या माध्यमातून पूर्ण केला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रभाग १६ ला पहिला महापौर देण्याचा मान मिळाल्याबद्दल त्यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले.

संतोष शेट्टी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ग्लोबल व्हिजनमुळे सर्व धर्म व समाजाला सुरक्षितता मिळाली आहे. गरीब, गरजू आणि होतकरू व्यक्तींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे. दक्षिण भारतातून आलेला मी गेली १८ वर्षे पनवेलची सेवा करत असून आज ही भूमी माझी कर्मभूमी असल्याचा मला अभिमान आहे."

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी महायुती सरकारच्या गतिमान विकासकामांचा उल्लेख करत येत्या काळात करदात्यांना कोणतीही चिंता उरणार नाही, असा आशावाद व्यक्त केला. या सभेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाक्षिणात्य भाषेतून समाजबांधवांशी संवाद साधत शुभेच्छा दिल्या. पनवेलमधील विकासकामांबाबत दाक्षिणात्य व इतर समाजघटकांकडून मिळणारा सकारात्मक प्रतिसाद समाधानकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. कविता चौतमोल, राजेश्री वावेकर, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, डॉ. घरत आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी मिळून मतदारांनी मतदानरूपी प्रेम द्यावे, असे आवाहन केले.पनवेलमधील दाक्षिणात्य समाजाचा हा एकसंघ पाठिंबा भाजप महायुतीसाठी आगामी निवडणुकीत निश्चितच बळ देणारा ठरत असल्याचे चित्र या प्रचारसभेतून स्पष्ट झाले.

# अनुष्का मृत्यू प्रकरणाचे सिल्लोडमध्ये पडसाद; मुंडण करून सरकारचा जाहीर निषेध

## लातूरच्या लेकीला न्याय देण्यासाठी लहुजी क्रांती सेना व सकल मातंग समाज आक्रमक

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता सहावीत शिकणाऱ्या अनुष्काचा संशयास्पद मृत्यू हा घातपात असल्याचा संशय व्यक्त करत, या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी सिल्लोड येथे लहुजी क्रांती सेना आणि सकल मातंग समाजाच्या वतीने भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी संतप्त आंदोलकांनी भररस्त्यात मुंडण करून महाराष्ट्र सरकार आणि लातूर स्थानिक प्रशासनाचा जाहीर निषेध केला.

लातूर येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या हॉस्टेलमध्ये ४ जानेवारी रोजी अनुष्काचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळला होता. शालेय प्रशासनाने ही आत्महत्या असल्याचे म्हटले असले तरी, घटनास्थळाची परिस्थिती पाहता हा घातपात




असल्याचा आरोप नातेवाईक व समाज बांधवांकडून होत आहे. पोलीस प्रशासन या प्रकरणातील दोषींना पाठीशी घालत असल्याचा आरोप करत सिल्लोड तालुक्यातील समाज बांधवांनी आक्रमक पवित्रा घेतला. स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापासून या मोर्चाला सुरुवात झाली. हातात काळे झेंडे, दंडाला काळ्या फिती बांधून आणि सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला. यावेळी आंदोलकांनी मुंडण करून प्रशासनाचा निषेध नोंदवला.

यावेळी तहसीलदारांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आले. या निवेदनात प्रामुख्याने विद्यालयातील शिपायाची नार्को टेस्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, तपासात हलगर्जीपणा करणारे लातूरचे जिल्हाधिकारी (अध्यक्ष, नवोदय विद्यालय) व संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकरणात सहआरोपी करून त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करावे, पीडित कुटुंबाला ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देऊन कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी लहुजी क्रांती सेनेचे प्रदेशाध्यक्ष अशोकराव कांबळे, मराठवाडा अध्यक्ष सखाराम अहिरे, जिल्हाध्यक्ष नानासाहेब गायकवाड, साहेबराव दनके, फकिरचंद तांबे यांनी उपस्थितांना संबोधित केले. या मोर्चात नामदेव खेत्रे, शिवराम कांबळे, सुखदेव कांबळे, संजय कांबळे, त्रिंबक शेजुळ, काशिनाथ शिंदे, साहेबराव अहिरे, सर्जेराव शेजुळ, बाबुराव अहिरे, भगवान सोनवणे, किशोर भिसे, समाधान लोखंडे, विष्णू साळवे, रतन आंभोरे, दादासाहेब शिरसाठ, नितीन सौदागर, विशाल अहिरे यांच्यासह सकल मातंग समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संघर्ष,साधना आणि सत्यनिष्ठेचा दणदणीत विजय!

# आदरणीय ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांची दैनिक युवक आधारच्या विदर्भ संपादकपदी ऐतिहासिक निवड

अमरावती पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्यांचे शब्दांकन नव्हे, तर समाजाच्या वेदनांना वाचा फोडण्याचे धाडस, अन्यायाविरोधात उभे राहण्याची हिंमत आणि सत्यासाठी अखंड लढा.या मूल्यांशी निष्ठावान राहत अतोनात मेहनत, प्रामाणिकपणा, सातत्य आणि निर्भीड लेखणीच्या जोरावर स्वतःची ठळक ओळख निर्माण करणाऱ्या आदरणीय ज्योत्सना करवाडे मॅडम यांची दैनिक युवक आधारच्या विदर्भ संपादकपदी निवड होणे हा त्यांच्या संघर्षमय प्रवासाचा सुवर्णक्षण ठरला आहे. या गौरवशाली निवडीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

सुरुवातीच्या टप्प्यात अनेक अडचणी, मर्यादा आणि आव्हाने असतानाही त्यांनी पत्रकारितेचा मार्ग कधीही सोडला नाही. दिवस-रात्र न पाहता क्षेत्रात काम करणे, दुर्गम भागातील जनतेचे प्रश्न समोर आणणे, अन्यायग्रस्तांचा आवाज बनणे आणि सत्याशी तडजोड न करता निर्भीडपणे लिखाण करणे — हा त्यांचा स्वभावच बनला. प्रत्येक बातमीमागे असलेला सखोल अभ्यास, पडताळणी आणि सामाजिक भान यामुळे त्यांचे कार्य सातत्याने उठून दिसत गेले.या अतोनात मेहनतीची आणि पत्रकारितेतील प्रामाणिक



वाटचालीची दखल दैनिक युवक आधारचे आदरणीय संपादक आमले सर यांनी घेतली. गुणवत्तेला संधी देणारी दृष्टी, स्पष्ट वैचारिक भूमिका आणि निर्भीड पत्रकारितेचा पाया मजबूत करणाऱ्या आमले सर यांच्या मार्गदर्शनाखाली ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांना अधिक जबाबदारीच्या भूमिका मिळत गेल्या.संघटनात्मक शिस्त,लेखनातील सातत्य आणि टीमवर्कला प्राधान्य देणारे सहसंपादक आदरणीय मुकुंद कांबळे सर यांनीही त्यांच्या कामाची सातत्याने दखल घेतली.त्यांच्या लेखनातील धार,समाजभान आणि नेतृत्वगुण पाहूनच त्यांना या महत्त्वाच्या पदासाठी योग्य समजण्यात आले.

यासोबतच दैनिक युवक आधारचे महाराष्ट्राचे उपसंपादक आदरणीय राजू शिंदे सर यांनीही त्यांच्या कार्याची वेळोवेळी प्रशंसा करत त्यांच्या मेहनतीला पाठबळ दिले.संघटनेच्या व्यापक कार्यप्रणालीत त्यांची भूमिका लक्षात घेऊन, ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांचे कार्य केवळ विदर्भापुरते मर्यादित न राहता राज्यपातळीवरही प्रभावी ठरत असल्याची दखल घेण्यात आली, हे विशेष उल्लेखनीय आहे.

आज विदर्भ संपादक या अत्यंत जबाबदारीच्या पदावर पोहोचताना,आदरणीय ज्योत्स्ना करवाडे मॅडम यांचा संघर्षमय प्रवास अनेक नवोदित पत्रकारांसाठी प्रेरणास्थान ठरत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली विदर्भातील जनतेचे प्रश्न अधिक बुलंदपणे मांडले जातील, ग्रामीण व शहरी भागातील सत्य अधिक ताकदीने समोर येईल आणि दैनिक युवक आधारची निर्भीड, लोकाभिमुख ओळख आणखी मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

संघर्षातून सिद्ध झालेल्या या यशाबद्दल आदरणीय ज्योत्सना करवाडे मॅडम यांचे पुन्हा एकदा मनःपूर्वक अभिनंदन! सत्य, समाज आणि पत्रकारितेसाठी सुरू असलेली ही वाटचाल अधिक तेजस्वी, यशस्वी व प्रेरणादायी ठरो, हीच सदिच्छा!

**शब्दलेखन...**
**करण धोंगडे**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**
**दैनिक युवक आधार....**
**वाशिम जिल्हा संघटक**
**माहिती अधिकार पत्रकार**
**संरक्षण व पोलीस मित्र**
**समिती महाराष्ट्र राज्य..**

# कोळी येथे फिरत्या व्हॅनद्वारे कॅन्सर तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे/हदगाव :** तालुक्यातील कोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य विभागाच्या फिरते कॅन्सर व्हॅनद्वारे १३ जानेवारी रोजी मोफत कॅन्सर तपासणी शिबिर राबवून - रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

प्रथमतः स्वामी विवेकानंद व राजमाता राष्ट्रमाता मा जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन आरोग्य अधिकारी डॉ. राठोड सर यांनी केले. कॅन्सर व्हॅनद्वारे मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाचा कर्करोगासारख्या व्याधीचा तसेच दातांच्या सामान्य समस्यावर उपचार करण्यात

तसेच दातांच्या सामान्य समस्यावर उपचार करण्यात आले. वारंवार तोंड येणे, मासिक पाळी व्यवस्थित न होणे, कंबर दुखीचे निदान व उपचार करण्यात आले.



उपरोक्त शिबिरात 156 स्त्री तसेच 43 पुरुषांनी मुखरोग व कर्करोग तपासणी व उपचार केले. स्त्रीरोग तज्ञ डॉ. पवार साहेब , दंतविकार तज्ञ डॉ. रवींद्र तोष्णीवाल यांनी रुग्णांची तपासणी व उपचार केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. राठोड सर , डॉ. देवमाने सर , डॉ. अरविंद वानखेडे मेडिकल ऑफिसर , भावना काटकर आरोग्य सेविका , वर्षा जाधव आरोग्य सेविका , राजाराम पाटील चौतमाल , पोलीस पाटील राजू कापडे तसेच आरोग्य केंद्रातील अधिकारी आशा वर्कर तसेच मोठ्या प्रमाणात गावकरी मंडळी यांची उपस्थिती होती. कॅन्सर तपासणी शिबिराला रुग्णांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. उल्लेखनीय म्हणजे कोळी प्राथमिक आरोग्य केंद्रात १३ जानेवारीचे औचित्य साधून कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले.

# हेमलकसा चा देव माणूस जेएन पीएममध्ये डॉ .प्रकाश आमटे यांचा काळजाला भिडणारा प्रवास; मुक्त संवादातून उलगडला

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** 'समाजसेवा ही केवळ जबाबदारी नसून ते एक व्रत आहे, आदिवासींच्या अंधारमय जीवनात प्रकाशाचा किरण पोहोचवण्यासाठी केवळ औषधांची नाही तर माणुसकीच्या स्पर्शाची गरज असते ."असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले जवाहरलाल नेहरू पोट प्राधिकरण ( जे एन पी ए )द्वारे आयोजित "एक मुक्त संवाद "या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते .सोमवार दिनांक १२ जानेवारी २०२६रोजी जे एन पी ए टाऊनशिप मधील बहुउद्देशीय सभागृहात हा सोहळा अत्यंत भावुक आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन जे एन पी ए बोर्ड सदस्य श्री दिनेश पाटील, श्री रवींद्र पाटील, कामगार नेते गणेश घरत ,निमंत्रक संगीता पाटील आणि समन्वयक संतोष बहिरा यांनी केले होते. व्यासपीठावर मनीषा जाधव ( महाप्रबंधक प्रशासन सचिव),सुरेश बाबू ( मुख्य महाप्रबंधक) आणि कॅप्टन बाळासाहेब पवार (उपसंरक्षक) यांचे प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमात डॉ. प्रकाश आमटे आणि डॉक्टर मंदाकिनी आमटे यांनी हेमलकसा येथील




त्यांच्या ५० वर्षाच्या संघर्षाचा पट उपस्थितांसमोर मांडला. आदिवासी बांधवांना आरोग्य, शिक्षण आणि आत्मनिर्भरता प्रदान करताना आलेल्या अडीअडचणी आणि त्यातून मार्ग काढताना मिळालेला आनंद त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाच्या वेळी डॉ .आमटे दांपत्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी प्रकर्षाने दिसून आली. त्यांच्या साधेपणाने आणि सहज सुंदर संवादाने उपस्थितांना अक्षरशा मंत्रमुग्ध केले. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देताना जीवनातील साधी पण महत्त्वाची तत्वे उलगडली. या कार्यक्रमासाठी जे एन पी ए चे अधिकारी कर्मचारी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि असंख्य श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. आमटे यांच्या प्रत्येक वाक्यावर सभागृहात टाळ्यांचा कडकडाट होत होता. त्यांचा प्रेरणादायी प्रवासा ऐकून अनेक उपस्थितांचे डोळे पाणावले. समाजकार्याचा हा प्रकाश प्रत्येक हृदयात तेवत राहावा अशा भावना व्यक्त करत एका महान देव माणसाचा सहवास आणि त्यांचे विचार ऐकून संपूर्ण सभागृह भारावून गेले, वाटत होते हा संवाद कधी संपूच नये.

अनेकांना जगण्याची नवी उमेद मिळाली. या महान देव माणसाचा प्रेरणादायी प्रवास प्रत्येक भारतीयांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

# विकसित भारत–जी–राम–जी’ योजनेमुळे ग्रामीण भागात येणार रोजगार व आत्मनिर्भरतेची नवी क्रांती – आमदार विनोद अग्रवाल

## शेतकरी व मजूरांच्या हितासाठी तसेच ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी एक ठोस कायदा

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया) :** गोंदिया मतदारसंघाचे आमदार विनोद अग्रवाल यांनी 12 जानेवारी रोजी स्थानिक शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकारने लागू केलेल्या ‘विकसित भारत–जी राम जी’ या नव्या योजनेमुळे ग्रामीण जीवनात घडणाऱ्या क्रांतिकारी बदलांविषयी माध्यमांना सविस्तर माहिती दिली.

आमदार विनोद अग्रवाल म्हणाले की, विकसित भारत–जी राम जी योजना ही फक्त रोजगाराचे आश्वासन नसून टिकाऊ आजीविकेची हमी आहे. ही योजना ग्रामीण भारताला आत्मनिर्भर बनवून विकसित भारताच्या पायाभरणीला बळकटी देईल. गरिब, आदिवासी आणि मागासवर्गीयांना रोजगार मिळावा यासाठी हा कायदा आणण्यात आला आहे.

ते पुढे म्हणाले की, विकसित भारत 2047 या राष्ट्रीय दृष्टिकोनानुसार ग्रामीण विकासाचे नव्या स्वरूपाचे आराखडे तयार करायचे आहेत. या कायद्यातील जुन्या तरतुदींमध्ये सुधारणा करून गावांना अधिक अधिकार व स्वायत्तता देण्यात आली आहे. हा विधेयक म्हणजे भारताच्या ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाकडे टाकलेले ठोस पाऊल आहे. भ्रष्टाचारमुक्त ग्रामपंचायत, सुशासन आणि जनभागीदारी हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

आमदार अग्रवाल पुढे म्हणाले की, या योजनेमुळे आत्मनिर्भर व सक्षम गावांची उभारणी शक्य होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासाठी गरीब, शेतकरी आणि मजूर यांचा विकास ही सदैव प्राधान्याची बाब राहिली आहे. ‘विकसित भारत–जी राम जी’ योजनेचा मुख्य हेतू म्हणजे जुन्या कायद्यांतील त्रुटी दूर करणे, व्यवस्थेत पारदर्शकता आणणे, भ्रष्टाचारावर प्रभावी नियंत्रण ठेवणे आणि राज्यांच्या सहकार्याने या योजनेचे डिजिटायझेशन करणे. तसेच विकसित ग्रामपंचायत उभारणे, गावांना त्यांच्या गरजेनुसार विकास आराखडे तयार करण्याचा अधिकार देणे आणि



ग्रामसभांना सक्षम करणे हे देखील या योजनेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

योजनेनुसार मजुरांना वर्षातून 125 दिवसांचे रोजगार दिले जाणार आहेत. मजुरीची रक्कम सात दिवसांत थेट बँक खात्यात जमा होईल आणि विलंब झाल्यास व्याजासह देयक अदा केले जाईल. तसेच एक नवीन ग्रामीण रोजगार हमी कार्ड जारी केले जाईल, जे काम मागणे, मजुरी मिळवणे आणि आपले हक्क सांगण्यासाठी एक अधिकृत व मजबूत दस्तऐवज ठरेल. सरकारचा उद्देश प्रत्येक गाव आत्मनिर्भर करणे व देशाच्या एकूण विकासात त्यांचा सक्रिय सहभाग निश्चित करणे हा आहे.या योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून 60 टक्के आणि राज्य सरकारकडून 40 टक्के निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

या पत्रकार परिषदेत आमदार विनोद अग्रवाल यांच्यासोबत भाजप जिल्हाध्यक्षा सौ. सीताताई रहांगडाले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले, भाजप जिल्हा महामंत्री सुनील केलनका, नरेंद्र वाजपेयी, शहराध्यक्ष ऋषिकांत साहू, जयंत शुक्ला तसेच भाजपचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# देवगावच्या अभिनव शाळेत नायलॉन मांजा न वापरण्याची शपथ

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी :** देवगाव येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचलित अभिनव बालविकास मंदिर शाळेत मकरसंक्रांत सणानिमित्त नायलॉन मांजाच्या वापराविरोधात जनजागृती करण्यात आली. माणूस व पक्ष्यांना वेदना देणाऱ्या नायलॉन मांजाचा वापर न करण्याची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली.

शाळेचे मुख्याध्यापक सुदर्शन जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नायलॉन मांजाशिवाय साध्या दोऱ्याचा वापर करून मोकळ्या मैदानात सुरक्षित पद्धतीने पतंग उडवण्याचे आवाहन केले. तसेच कुणी नायलॉन मांजा वापरत असल्यास त्यांना समजावून त्यापासून परावृत्त करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

यास प्रतिसाद देत विद्यार्थ्यांनी पतंग उडवताना नायलॉन मांजाचा वापर न करण्याची शपथ घेतली. मकरसंक्रांत म्हणजे नातेसंबंध अधिक गोड करण्याचा सण असून, हा सण साजरा करताना



कुणालाही इजा होणार नाही याची दक्षता घेण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपशिक्षक नितेश राऊत यांनी पतंग बनवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. हिवाळयात शरीराला स्निग्ध पदार्थांची गरज असते, म्हणून तीळ, गूळ, गाजर, हरभरे, ऊस व बोरे यांचे महत्त्व उपशिक्षिका स्वाती घोटेकर यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमप्रसंगी प्राचार्य के. एम. गाजरे व पर्यवेक्षिका एस. टी. गांगुर्डे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंकुश बोराडे, जयश्री गांगुर्डे, सोनाली उन्हवणे, आशा सोनवणे, स्वाती वरे, सविता बोराडे, हर्षद बस्ते, प्रताप मोरे, गणेश कोरडे, वंदना उराडे व सुरेखा मोरे यांनी परिश्रम घेतले.

# नवनिर्माण प्राथमिक शाळा, महासांगवी रोड पाटोदा येथे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनधी) :** पाटोदा येथील नवनिर्माण प्राथमिक शाळेत दिनांक १२/०१/२०२६ वार सोमवार रोजी राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास शाळेतील शिक्षकवर्ग, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक पठाण नईम सर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवरांनी या दोन्ही थोर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राजमाता



जिजाऊ माँसाहेब यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेले संस्कार, त्यांचे राष्ट्रभक्तीचे विचार तसेच स्वामी विवेकानंद यांनी दिलेला युवकांना आत्मविश्वास, चारित्र्य व राष्ट्रसेवेचा संदेश याचे महत्त्व या वेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाषणे, कविता व मनोगत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. काही विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या मातृत्वाची व स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारांची माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना सदाचार, कर्तव्यनिष्ठा, राष्ट्रप्रेम व आत्मविश्वास या मूल्यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, प्रेरणादायी व यशस्वीरीत्या पार पडला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासास चालना मिळते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या प्रसंगी अनेक विद्यार्थिनींनी राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब व बाल शिवबा यांची वेशभूषा साकारली. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्रीम.बडे मॅडम यांनी केले. या वेळी शाळेच्या सहाशिक्षिका श्रीम.बांगर मॅडम, श्रीम. सानप मॅडम, श्रीम.शिंदे मॅडम, श्री. डोके सर, श्री.खाडे सर, श्री.बांगर सर, श्री.रंधवे सर यांच्या सह नवनिर्माण कन्या शाळेचे सहशिक्षक श्री.भोसले सर व श्री गाढवे सर व बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

# मॉर्निंग वॉकला आलेल्या नागरिकांशी विश्वास पेटकर यांनी साधला संवाद; आघाडीला मतदान करण्याचे आव्हान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने प्रभाग 9 मध्ये वळवली ग्रामपंचायतीचे माजी सरपंच आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी तालुकाप्रमुख विश्वास पेटकर यांनी मॉर्निंग वॉकला आलेल्या नागरिकांशी संवाद साधत महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आव्हान केले.




पनवेल महानगरपालिका निवडणूकीत महाविकास आघाडी कडून प्रभाग 9 (ब) मध्ये विश्वास पेटकर यांच्या पत्नी भारती विश्वास पेटकर (निशाणी शिट्टी) उभे असून त्यांच्या समवेत शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस प्रकाश म्हात्रे (9 ड) निवडणुक लढवत असून त्यांची निशाणी शिट्टी आहे. प्रकाश म्हात्रे कामगार नेते असून कामगार वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी नेहमीच अग्रेसर असतात. तसेच रिलायन्स SEZ साठी आंदोलन मध्ये सक्रिय सहभागी असून टेम्भोडे वळवली संघर्ष समितीचे अध्यक्ष आहेत. मुंबई ऊर्जा प्रकल्पाकडून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मोबदला देण्यात प्रकाश म्हात्रे यांचा महत्वाचा वाटा आहे. तसेच प्रभाग (9 अ) मधून मालती पिंगला (निशाणी शिट्टी), आणि नीलिमा पाटील (9क) निशाणी झाडू हे महाविकास आघाडी मधून निवडणूक लढवत आहेत. माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविकास हे उमेदवार निवडणूक लढवत आहेत. यावेळी त्यांनी नागरिकांना मालमत्ता कर, पर्यावरण रक्षण, प्रदूषण, पाणी प्रश्न, रस्ते, गटारे, झोपडपट्टी निर्मूलन, आदिवासी बांधवांचे प्रश्न, गार्डन, जॉगिंग ट्रॅक, स्केटिंग साठी ट्रॅक, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न, समाजाचे प्रश्न, पायाभूत सुविधा, बेरोजगारीचा प्रश्न, खेळाचे मैदान, वाहतूक कोंडी असे अनेक प्रश्न प्रभागात आहेत. हे प्रश्न मार्गी लागण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार करणार असल्याचे सांगून महाविकास आघाडीला मतदान करण्याचे आव्हान केले.

# लातुर येथील अनुष्का पाटोळे च्या मारेकयांना कठोर शासन करा - दगडूबा घोडे

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** लातुर येथील दलित विद्यार्थीनी अनुष्का पाटोळे हिच्या संशयास्पद मृत्य प्रकरणी योग्य तपास करून संबंधीतावर कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन अनुष्का किरणकुमार पाटोळे रा. टाका ता.औसा जि.लातुर येथील विद्यार्थीनी नवोदय विद्यालय लातुर येथे इयत्ता सहावीच्या वर्गात शिक्षण घेत होती या विद्यार्थीनीचा संशयास्पद मृत्यु वस्तीगृहा मध्ये झाला आहे या प्रकरणी आज अनुष्काच्या कुटूंबियांची माहिती अत्यंत विदारक आहे,एकतर ज्या अवस्थेत तीचा फोटो दिसत आहे तो फाशी घेण्याचा हा प्रकार आहे आस त्यातुन जानवत नाही तिची डेड बॉडी तीच्या कुटुंबियांची परवानगी न घेता हॉस्टेल मधुन उचलण्यात आली कुटुंबियांना सांगण्यात आले कि अनुष्का हि जिवंत आहे. अनुष्काच्या डेड बॉडी वरील खुना या संशयास्पद आहेत.सदरिल



प्रकरणाची सी.आय.डी. मार्फत चौकशी करून आरोपी विरूध्द कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा नसता आम्ही सर्व दलित संघटनाना सोबत घेऊन अझाद क्रांती सेनेच्या वतीने व्यापाक अंदोलन उभे करू याची गांभीर्याने नोंद घ्यावी असा इशारा परतूर येथील आझाद क्रांती सेनेचे जालना जिल्हा अध्यक्ष दगडूबा पांडुरंग घोडे यांनी उपविभागीय अधिकारी परतूर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे. या वेळी इंद्रजीत हिवाळे, सदाभाऊ शिरसाट, पत्रकार प्रभाकर प्रधान, रमेश पाईकराव यांची उपस्थिती होती.

# युवकांना दिशा देण्याची उर्जा स्वामी विवेकानंद यांच्या विचारधारेत व आदर्श

## प्रजापालक राजा बनवण्याची क्षमता राजमाता जिजाऊ यांच्यात होती - कुंडलकर

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** राष्ट्र प्रेम ,राष्ट्र भक्ती युवा वर्गात निर्माण करून त्यांना मानवतावादी विचार धारेच्या प्रवाहात आणण्यासाठी व आदर्शवादी विचारावर नवयुवक भक्कम पणे उभारून भारतीय युवक जागतिक स्तरावर आधिक प्रभावी व सुसंस्कृत विचाराने सक्षम असावा या साठी युवकांना दिशा देण्याची उर्जा स्वामी विवेकानंद यांच्या विचारधारेत आहे. आदर्श राज्य सत्ता कर्तृत्ववान न्याय प्रिय, सदैव प्रजेला आपल्या कर्तृत्वाने कार्यकुशलतेने आदर्श प्रजा पालक राजा छत्रपती शिवाजी महाराज बनवण्याची क्षमता राजमाता जिजाऊ यांच्यात होती असे प्रतिपादन लेखापरीक्षक दिंगाबर कुंडलकर यांनी दिनांक १२ जाने रोजी गुरूवर्य



भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय, इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या संयुक्त जयंती निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ए.जी.नागरगोजे होते. स्वामी विवेकानंद व जिजाऊ यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान पारिवारातील सदस्य प्रतिष्ठानच्या प्रत्येक कार्यक्रमात हिरीरीने सहभाग घेणारे अनेक पुरस्काराने सन्मानित बीड येथील प्रसिध्द लेखापरीक्षक श्री.दिगंबर कुंडलकर यांना राज्य स्तरीय दर्पणरत्न पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचा सत्कार श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड व वाचनालयाच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे संचालक डॉ.राजेंद्र सानप यांनी केला. या वेळी एम.डी.पांचाळ, आर के भोंडवे, शिवलिंग घोंगडे, केशव बडे, धनंजय सानप, संतोष सावंत, अथर्व वखरे, एच.आर.सानप यांच्या सह असंख्य वाचक उपस्थित होते. या कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

# वरुड येथे इंद्रराज महाविद्यालयाच्या 'रासेयो' श्रमसंस्कार शिबिराचे थाटात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाच्या वतीने आयोजित सात दिवशीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचा वरुड येथे १० जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात शुभारंभ झाला. 'पडीक जमीन व जलव्यवस्थापन यासाठी युवा' हे ब्रीदवाक्य घेऊन या शिबिराची सुरुवात करण्यात आली आहे.

शिबिराचे उद्घाटन व मुख्य वक्ते म्हणून संस्थेचे सचिव अशोक देवरे उपस्थित होते. यावेळी त्यांनी युवकांनी



श्रमसंस्कारातून ग्रामविकासाचे योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. जी.जी. राजपूत हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये उपप्राचार्य प्रा. डॉ. व्ही. बी. लांब, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सी. एम. काळे, वरुड गावचे सरपंच दीपक कळम व उपसरपंच गुलाब मिरगे उपस्थित होते.

याप्रसंगी गावाचे माजी सरपंच भानुदास मिरगे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. १० ते १६ जानेवारी २०२६ या दरम्यान शिबिरामध्ये बालविवाह रोखणे, मतदान व पर्यावरण जनजागृती, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर तसेच जलसंवर्धन व पडीक जमीन व्यवस्थापन यांसारखे समाजोपयोगी उपक्रम राबविले जाणार आहेत. यातून स्वयंसेवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. एम. बिरादार यांनी केले, प्रास्ताविक डॉ. के. आर. नगरे यांनी मांडले, तर आभार प्रा. डॉ. प्रीतम मुळे यांनी मानले. या उद्घाटन सोहळयाला रासेयो कार्यक्रमाधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, गावातील प्रतिष्ठित नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासकीय रेखाला परीक्षेत जासई विद्यालयाला घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** महाराष्ट्र राज्य कला संचलनाया तर्गत राज्य कला शिक्षण मंडळाद्वारे सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीयजे चित्रकला (रेखाकला) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून जासई गावचे विद्यालय रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि बा पाटील ज्युनिअर कॉलेज जासई, या विद्यालयातील एलिमेंट्री परीक्षेसाठी बसलेले



एकूण ९६ विद्यार्थी त्यापैकी पात्र ७३ विद्यार्थी ब श्रेणी प्राप्त केलेले ४ विद्यार्थी क श्रेणी प्राप्त केलेले ६९ विद्यार्थी तसेच इंटरमिजिएट परीक्षेसाठी बसलेले एकूण ३१ विद्यार्थी त्यापैकी पात्र ३० अ श्रेणी प्राप्त २ विद्यार्थी ब श्रेणी प्राप्त ३ विद्यार्थी क श्रेणी प्राप्त २५ विद्यार्थी हे सर्व विद्यार्थी रेखा कला परीक्षेत यशस्वी झाले. यांना मार्गदर्शन करणारे शाळेचे कलाशिक्षक श्री जोशी डी डी सर यांचे व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम शाळेचे उपमुख्याध्यापक श्री कुटे सर पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी यांच्याकडून मार्गदर्शन करणारे श्री जोशी सर व यशस्वी विद्यार्थी यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# आयुष्याच्या उज्ज्वल पटलासाठी शाळा हे प्रभावी व्यासपीठ- दत्तात्रेय जोंधळे

## पालखेड विद्यालयात वार्षिक गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/ राहुल कुलकर्णी :** शालेय जीवनातच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो ग्रामस्थ,पालक, माजी विद्यार्थी व दानशूर व्यक्तींनी गावोगावी समाजातील महत्वाची भूमिका बजावणाऱ्या व सुजान पिढी निर्माण करणाऱ्या शाळा या माध्यमाला स्वतःचे राजकीय जोडे बाजूला काढून निस्वार्थीपणे नेहमी मदत केली पाहिजे असे आवाहन करून आयुष्याच्या उज्ज्वल पटलासाठी शाळा हे प्रभावी व्यासपीठ असल्याचे प्रतिपादन पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे वार्षिक गुणगौरव सोहळा व सांस्कृतिक कार्यक्रमाप्रसंगी व्यासपीठावरून महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष/सचिव दत्तात्रय जोंधळे यांनी केले,

याप्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे,सचिव दत्तात्रय जोंधळे, पालखेडच्या सरपंच अश्विनी आहेर,सदस्य राजेंद्र आहेर, योगेश होलगडे,अशोक थेटे, संदीप गांगुर्डे,ताराबाई थेटे, सोसायटीचे चेअरमन ज्ञानेश्वर जाधव, पिंपळगाव खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक रमेश शिंदे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष धर्माजी गीते, भाऊसाहेब शिंदे,कृष्णा



बक्षीस वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम समारंभप्रसंगी बोलतांना कार्याध्यक्ष दत्तात्रय जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे यांसह समवेत मान्यवर

थेटे, माजी सरपंच रवींद्र कोकाटे, स्कूल कमिटीचे उपाध्यक्ष अशोक आहेर, मंगेश छाजेड,विलास थेटे, बाळासाहेब थेटे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सतीश थेटे, शिक्षक पालक संघाचे सहसचिव विजय आहेर, माजी अध्यक्ष माधव खैरे, शरद आहेर, माजी मुख्याध्यापक दत्ताराम थेटे, अविनाश कोठावदे, मुख्याध्यापक विना काळे, मुख्याध्यापक अशोक शेळके, कैलास गवळी आदी मान्यवर व्यासपीठावर होते,

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वर्षभरातील क्रीडा,निबंध,वक्तृत्व,विज्ञान आदीसह विविध स्पर्धांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह,मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले,

कार्यक्रमाच्या प्रास्तविकात मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी शालेय उपक्रम, बोर्ड परीक्षा निकाल ,पोषण आहार,विद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतचा प्रगतीचा आलेख आदींसह शाळेच्या प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर मांडला.

त्यानंतर जलसंपदा विभागात गौरव शिरवाडकर तसेच डॉ.रोहित गुऱ्हाळे, चार्टर्ड अकाउंट विजय गुऱ्हाळे, पोलीस ऋतिक काळे,प्रदीप पवार आदी माजी विद्यार्थ्यांची निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात गणेश वंदना,विठू माऊली,शेतकरी,शिवाजी महाराजांवरील गीत,आर्मी गीत,आई-बाबांवरील गीत, नाटिका याबरोबरच वैशिष्ट्यपूर्ण वेशभूषा करून सादर केलेल्या नृत्यांस उपस्थित प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला,

याप्रसंगी निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह पालखेड, रानवड,दावचवाडी, लोणवाडी,कुंभारी,वावी ठुशी आदी गावांसह पंचक्रोशीतील पालक,ग्रामस्थ,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद व स्वराज्य माता जिजामाता यांची जयंती जासई विद्यालयात साजरी

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई या विद्यालयात आज वार सोमवार दिनांक १२ जानेवारी रोजी स्वामी विवेकानंद व स्वराज्य माता जिजामाता यांची जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्षा ,सौ म्हात्रे के जी मॅडम .यांनी प्रतिमा पूजन केले. तसेच उपमुख्याध्यापक श्री कुटे सर, पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम, सर्व शिक्षक वृंद यांनी उपस्थित राहून प्रतिमा पूजन केले. इयत्ता सातवी अ च्या विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद व स्वराज्य जननी जिजामाता यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेचे उपशिक्षक श्री गाताडी सर यांनी स्वामी विवेकानंद



यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे भाषण केले. शाळेच्या उपशिक्षिका सौ अंकिता ठाकूर मॅडम यांनी स्वराज्य जननी जिजाबाई यांनी केलेल्या कार्याची महती सांगितले. तसेच शेवटी अध्यक्षीय भाषणात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ म्हात्रे के जी मॅडम यांनी स्वामी विवेकानंद व स्वराज्य जननी जिजामाता यांच्याविषयी मुलांना मार्गदर्शन केले. शेवटी आभार मानून हा कार्यक्रम अध्यक्षाच्या वतीने संपन्न करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गाताडी सर यांनी केले.

# नागपूर महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ चे अनुषंगाने परिमंडळ 4 मधून 138 आरोपी तडीपार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक :** पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक चार नागपूर शहरांतर्गत माननीय पोलीस माननीय पोलीस उपायुक्त रश्मिता राव एन (भा पो से ) यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या आगामी नागपूर महानगरपालिका निवडणूक 2025 26 निवडणुकीच्या होणाऱ्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्याच्या उद्देशाने रेकॉर्डवरील 138 गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे. खून खुनाचा प्रयत्न दरोडा खंडणी दहशत वाजवणे दुखापत करणे यासारख्या गंभीर गुन्ह्यातील हे आरोपी आहेत. त्यांना निवडणूक संपेपर्यंत परिमंडळ क्रमांक चार च्या हद्दीतून तडीपार करण्यात आले. सदरचे आदेश माननीय पोलीस उपायुक्त रश्मिता राव भापोसे परिमंडळ क्रमांक चार यांनी दिले तसेच त्यांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी त्यांचे मतदान केंद्रावर हजर राहण्याची मुभा दिली. पोलीस ठाणेनिहाय तडीपारांची संख्या, अजनी पोलीस स्टेशन 35, हुडकेश्वर पोलीस स्टेशन 27 बेल तरोडी पोलीस स्टेशन 18,सक्करदरा पोलीस स्टेशन 20, नंदनवन पोलीस स्टेशन 23, इमामवाडा पोलीस स्टेशन 15 असे एकूण 138 आरोपींना तडीपार करण्यात आलेले आहे.सध्या शहरात महानगरपालिकेची निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून जानेवारी 16 जानेवारीपर्यंत आदर्श आचारसंहिता लागू आहे या कालावधीमध्ये मतदारांवरती दबाव हिंसाचार पैशाचे वाटप धमकी किंवा वर्चस्व दाखविण्याचे प्रकार टाळण्याकरिता दर निवडणुकीदरम्यान अशी तडीपार व प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. याच अनुषंगने परिमंडल क्रमांक चार मधील पोलीस ठाण्याकडील गुन्हे अभिलेख गुन्हेगारी इतिहास आणि सध्याचे हालचाली तपासून ही कारवाई करण्यात आलेली आहे. परिमंडळच्या अंतर्गत पोलीस ठाणे सक्करदरा,नंदनवन, इमाम वाडा, बेल तरोडी, अजनी, हुडकेश्वर या पोलीस ठाण्यांचा समावेश आहे. सदर तडीपार कारवाईमुळे गुन्हेगारांना निवडणूक काळात संबंधित कार्यक्षेत्रात प्रवेश वास्तव्य तसेच सार्वजनिक कार्यक्रम सभा मिरवणूक व खुले वावरण्यात सप्त मनाई करण्यात आलेली आहे. तडीपार आदेशाचा भंग करून संबंधित गुन्हेगारांनी परिमंडळ क्रमांक ४ च्या हद्दीत प्रवेश केल्यास किंवा सार्वजनिक शांततेला बाधा आणणारी कोणतीही कृती केल्यास त्यांच्यावर अधिक कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

# आईने स्वतःच्या मुलाविरोधात केली होती तक्रार

**दैनिक युवक आधार**

**देगलूर वार्ताहर :** सख्ख्या भावाच्या खून प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या आरोपी राजेंद्र पांडुरंग सूर्यवंशी याला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दिलासा दिला आहे.अपील प्रलंबित असताना त्याची जन्मठेपेची शिक्षा निलंबित करून जामिनावर मुक्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे व न्यायमूर्ती अबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठाने ०९ जानेवारी २०२६ रोजी हा निर्णय दिला.सदरील घटना वैभव नगर हडको नांदेड येथील असून दिनांक ०१ ऑक्टोबर २०२३ रोजी कौटुंबिक वादातून तिन भावांनी मिळून मयत नरेंद्र सूर्यवंशी याच्यावर बांबूच्या काठीने व दगडाने डोक्यात वार केला केला होता,ज्यात त्याचा मृत्यू झाला.

आरोपीतर्फे ॲड.संकेत शांताराम पाटील पळणीटकर यांनी युक्तिवाद करताना प्राणघातक वार आरोपी सत्येंद्र याने केल्याचे निदर्शनास आणले व सदरील आरोपी विरुद्ध सर्व वाजवी शंका पलीकडे जाऊन आरोपी विरोधातील आरोप सिद्ध होत नसून मा.सत्र न्यायाधीश नांदेड यांचा निर्णय कायद्याच्या चौकटीत नसून आरोपीस जामीन मिळण्यासाठी आरोपीची बाजू मांडली.

मयतावरती २९ जखमा आढळून आल्या असल्या तरी अर्जदाराची भूमिका मर्यादित असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते,असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने अपील लवकर सुनावणीस येण्याची शक्यता नसल्याचा उल्लेख केला. त्यानुसार २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर व एका जामिनदारासह आरोपीची सुटका करण्याचे आदेश देण्यात आले.

# जिजामाता गुरुकुल पाडळी येथे माँ.जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** दि.12 जानेवारी 2025 रोजी माता तुळजाभवानी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था राजाटाकळी संचलित जिजामाता गुरुकुल पाडळी येथे माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती प्रचंड उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुलची विद्यार्थी प्रतिनिधी तन्वी आर्दड ही होती तर प्रमुख पाहुणे म्हणून राहुल नाटकर ,आकाश मुंडे, राहुल पाईकराव, दिनेश चव्हाण व आर्दड मॅडम हे उपस्थित होते.



राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी माँ.जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विषयी आपले विचार मांडले.राधा बोराडे,तेजस चव्हाण,आर्या चव्हाण, खुशी चव्हाण, कार्तिक काळे, ज्ञानेश्वरी बोराडे, मयुरी चव्हाण,संभाजी साबळे, आकांक्षा शेळके, ऋतुजा देवकर, गौरव भुतेकर, इत्यादी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तर राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेमध्ये वर्ग तिसरितील आरुषी गवळी व वर्ग चौथीतील ऋतुजा लिंबोरे सहभागी झाल्या होत्या. प्रमुख पाहुणे व शिक्षकांनी आपले विचार मांडले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी खूप परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा देवकर तर आभार प्रदर्शन आकांक्षा शेळके या विद्यार्थिनीनी केले. सर्व विद्यार्थ्यांना अल्पोहर वाटप केल्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

# दिवंगत लोकनेते दि बा पाटील साहेब यांचा जन्मशताब्दी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी. भोईर :** रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा पाटील जुनिअर कॉलेज जासई,या विद्यालयात महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान जासई आणि श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनियर कॉलेज जासई यांच्या संयुक्त विद्यमाणे आज दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील साहेब यांचा जन्मशताब्दी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाप्रसंगी दि.बा.पाटील साहेबांवर प्रेम करणारे अनेक कार्यकर्ते तसेच पंचक्रोशीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. म्हात्रे के. जी. मॅडम ,उप मुख्याध्यापक श्री कुटे सर शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. मुकादम मॅडम यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या प्रांगणात असणाऱ्या महामानवांच्या अर्धकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले तसेच शाळेच्या प्रांगणात असणारे हुतात्मा स्मारक तसेच ज्ञान महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले तसेच दिवंगत लोकनेते दि. वा पाटील साहेबांच्या पूर्णकृती पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले तसेच दिवंगत लोकनेते दि.बा.पाटील साहेबांच्या पालखीचे पूजन केले. कामोठे गावचे रिक्षा चालक मालक संघटना यांनी ज्योत प्रज्वलित करून प्रस्थान केले. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी लोकनेते



दि.बा.पाटील साहेबांच्या जीवनावर आधारित भाषण केले त्यानंतर दि.बा. साहेबांच्या पालखीचे पूर्ण जासई गावात लेझीम पथकासोबत भव्य मिरवणूक काढण्यात आली.गावातील सुवासिनींनी पालखीलील दिबांच्या प्रतिमेस ओवाळणी करून आशीर्वाद घेतले. दी. बा.पाटील साहेबांच्या नामघोषाने संपूर्ण जासई गाव दुम दुमून गेला होता.महात्मा फुले सामाजिक प्रबोधन व परिवर्तन प्रतिष्ठान जासई यांकडून विद्यार्थ्यांना अल्प उपहार देण्यात आला तसेच कामोठे रिक्षा चालक-मालक संघटना व नवी मुंबई टॅक्सी संघटना यांच्याकडून विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करण्यात आले. जासई विद्यालय मार्फत सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले गेले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे प्राध्यापक श्री गाताडी सर व उपशिक्षिका श्रीमती घरत मॅडम यांनी केले.

# जल जीवन मिशनचे कामे संथगतीने;पाणी व्यवस्थापन,सांडपाणी व गटार नियोजनाचा अभाव

**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी/ दिपक गायकवाड :** बागलाण तालुक्यातील मुल्हेर येथील पाणीपुरवठा जलजीवन मिशन हे नियोजना अभावी फोल ठरत असून नागरिकांसाठी डोकेदुखी बनली आहे. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व रस्त्यांची दुर्दशा झाली असून ग्रामपंचायतिचे कचरा व्यवस्थापन, गटार व सांडपाणी यांचे नियोजन ढासाळले आहे.

गावात,गल्लीत वेळेवर घंटागाडी येत नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे साचले आहेत. यावर कुत्रे, मोकाट जनावरे आणि डुक्कराचा





वावर वाढला आहे. प्रशासनाकडून नियमित औषध फवारणी केली जात नसल्याने दुर्गंधी पसरत असून रोगराईचा धोका निर्माण होण्याची शक्यता असून गावात टायफाईड फ्ल्यू सारखे आजार बळावत आहेत.

गटारी व सांडपाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे अनेकदा सांडपाणी, गटारीतील दुर्गंधीत पाणी, शोषखड्डे,चेंबर भरून रस्त्यावरून पेठ गल्ली व शिवाजी चौक येथून संपूर्ण गावात रस्त्यावरून सांडपाणी वाहत आहे तर ठीकठिकाणी पिण्याची जलवाहिनी फुटल्याचे चित्र पहावयास मिळतात आहे.

परिसरात रस्त्यावरून सांडपाणी व गटारीतील दूषित पाणी वाहत असल्याने(वृद्ध महिला गटारीचे पाणी व सांडपाणीतून मार्ग शोधताना, दुसरीकडे डुकरांचा उच्छाद, मोकाट कुत्रे व कचरा)शाळकरी विद्यार्थी पाय घासरून पडत आहेत. गावातील नागरिकांना चालण्यास त्रास होत असून मनस्ताप सहन करत तारेवरची कसरत करावी लागत आहे.

याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाने नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन उघड्यावरील गटारी, सांडपाणी, सार्वजनिक चेंबरांमधील साचलेली घान, गाळ,कचरा यामुळे गटारीचे पाणी काही घरांमध्ये शिरत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. याकडे संबंधित विभागाने परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन नागरिकांना सुविधा देणे अपेक्षित आहे.

# चिरनेर येथील प्रयोगशील शेतकरी गोपाळ केणी यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील प्रयोगशील शेतकरी गोपाळ सोमा केणी (84) यांचे सोमवारी (दि.12) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास वृद्धपकाळाने (कातळपाडा) येथील राहत्या घरी निधन झाले आहे.दैनिक पुण्यनगरीचे पत्रकार तथा उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष जीवन केणी यांचे ते पिताश्री होते. 1954 मध्ये सातवी उत्तीर्ण असलेल्या गोपाळ केणी यांना त्याकाळी नोकरीची संधी असताना देखील त्यांना घरची शेती व पशुधन सांभाळावे लागले. त्यानंतर ते शेतीतच रमले. उत्तम, कष्टाळू व प्रयोगशील शेतकरी म्हणून ते पंचक्रोशीत सुपारीचित होते. भातशेतीबरोबर कडधान्य पिकाची शेती, बागायती शेती व मळ्याची शेती मोठ्या कष्टाने व मेहनतीने



पिकवून त्यांनी आपल्या संसाराचा गाढा ओढला. पशुधनावर त्यांचे जीवापाड प्रेम असल्यामुळे त्यांची निगा राखण्याचे काम त्यांनी उत्तम केले. संसाराचा रात्रंदिवस गाढा ओढत असताना, मुलांना शिक्षण व चांगले संस्कार दिले. उत्तम आचारी म्हणून ते प्रसिद्ध होते. त्यांच्या आवाजात चांगला गोडवा असल्यामुळे लग्न सोहळ्यात मंगलाष्टके सादर करण्याचा मान त्यांना दिला जात असे. कातळपाडा रंगभूमीची सेवा करण्यात देखील त्यांचे योगदान आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी रात्री उशिरा नातेवाईक व ग्रामस्थांसह वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुत्र, दोन कन्या, नातवंडे व पंतवडे असा परिवार आहे.

# विरोधकांच्या पाय खालची वाळू सरकल्यामुळेच माझ्यावर बिनबुडाचे आरोप - प्रभाग क्रमांक ११ चे महायुतीचे उमेदवार हॅप्पी सिंग

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** विरोधकांच्या पाय खालची वाळू सरकल्यामुळेच माझ्यावर बिनबुडाचे आरोप करत असल्याचे मत प्रभाग क्रमांक ११ चे महायुतीचे उमेदवार हॅप्पी सिंग यांनी पत्रकारांशी चर्चा करत असताना सांगितले. पनवेल महापालिका निवडणुकीचे प्रभाग क्रमांक ११ चे महायुतीचे उमेदवार हॅप्पी सिंग यांना मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे विरोधक त्यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत असल्याचे त्यांनी सांगितले.



या प्रभागात हॅप्पी सिंग यांच्यासह नीलम मोहित व प्रदीप भगत हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. हॅप्पी सिंग यांनी आत्तापर्यंत कामोठे वसाहतीमधील विकासासाठी मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. त्यांनी वाढदिवसानिमित्त आयोजित केली कुस्ती स्पर्धा देशभर प्रसिद्ध झाली आहे. त्याचबरोबर समाजकारण, राजकारण या क्षेत्रात त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. या कार्याची दाखल घेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी हॅप्पी सिंग यांना प्रभाग क्रमांक ११ मधून उमेदवारी दिली. या उमेदवारीचे हॅप्पी सिंग चीज करतील असा ठाम विश्वास या विभागातील मतदारांना आहे. त्यामुळे या भागातील विविध राजकीय संघटना सामाजिक मंडळे यांनी त्यांना पाठिंबा दिला असल्याने त्यांच्यासह इतर २ उमेदवारांचा विजय सुद्धा निश्चित मानला जात आहे. निवडणून आल्यास कामोठे वसाहतीमध्ये सुंदर असे एक कुस्ती संकुल त्याचप्रमाणे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, कामोठे वसाहती मधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली काढणे, तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे तसेच विविध शासकीय योजना आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून राबवण्याचा त्यांचा मानस आहे. प्रभाग क्रमांक ११ मध्ये हॅप्पी सिंग व त्यांच्या सहकाऱ्यांचे पॅनेलचे पारडे जाड मानले जात आहे.

# केनडियरच्या खास कफ इयररिंग्स

## आपला 'बोल्ड' आणि 'ब्युटीफुल' अंदाज गर्दीतही दिसा सर्वात वेगळ्या !

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** कल्याण ज्वेलर्सचा 'केनडियर' ब्रँड सादर करत आहे, आपले खास कफ इयररिंग्स कलेक्शन ज्यामध्ये बोल्ड लूक आणि सौंदर्याचा अप्रतिम संगम पाहायला मिळतो. हे केवळ इयररिंग्स नाहीत, तर तुमच्या वैयक्तिक शैलीचे प्रतिबिंब आहेत. साधेपणाला आपली ताकद मानणाऱ्या आणि प्रत्येक गोष्टीत सौंदर्य शोधणाऱ्या स्त्रियांसाठी हे कलेक्शन असून, ते तुमच्या स्टाईलला एक नवी ओळख देईल.

पाहताक्षणी मन जिंकणारे सौंदर्य प्रत्येक डायमंड कफमध्ये दिसतेय अप्रतिम कलाकुसर! हिऱ्यांनी मढवलेला प्रत्येक 'कफ इयररिंग' अशा प्रकारे डिझाइन केला आहे की तो तुमच्या कानांना स्पर्श करत एक शालीन लुक देईल. हा लुक आधुनिक असण्यासोबतच सदाबहार देखील आहे. सोने आणि हिऱ्यांचा हा नाजूक मेळ, उत्कृष्ट कारागिरी आणि कल्पकतेचे एक अनोखे उदाहरण आहे. हीच तर 'केनडियर'ची खरी ओळख आहे जी साधेपणातही लक्झरीचा अनुभव देते. हे डिझाइन्स केवळ दागिने नसून कलेचा एक उत्सव आहेत.'मून फेजेस डायमंड स्टड इयररिंग्स' निसर्गाच्या सौंदर्यापासून प्रेरणा घेऊन तयार केले आहेत. चंद्राची शांत आणि कोमल लय या इयररिंग्समध्ये उतरली आहे. चंद्राच्या विविध कला दर्शवणारे हे स्टड्स १४ किंवा १८ कॅरेट सोन्यात अतिशय सुंदररीत्या



घडवले असून त्यांना नाजूक हिऱ्यांनी सजवले आहे. ज्या महिलांना कहाणीची जोड असलेले दागिने आवडतात त्यांच्यासाठी हे दागिने अगदी परिपूर्ण आहेत अशी कहाणी जी चंद्रासारखीच चिरंतर आणि सदाबहार आहे.

'फराशा' डायमंड इअर कफ्स आधुनिक आणि स्टायलिश स्टेटमेंट तयार करण्यासाठी डिझाइन केले आहेत. १४ आणि १८ कॅरेट सोन्यात तयार केलेले आणि चमकदार हिऱ्यांनी मढवलेले हे इअर कफ्स बोल्ड डिझाइनसह दिवसभर घालण्यासाठी अतिशय आरामदायी आहेत. लग्न असो, पार्टी असो किंवा काहीतरी नवीन आणि वेगळे दिसण्याची इच्छा सर्वांमध्ये उठून दिसण्यासाठी हे इअर कफ्स सर्वोत्तम आहेत. हे तुमच्या स्टाईलला एक नवीन आणि खास ओळख देतात, जे प्रत्येक महिलेकडे असायलाच हवेत.

'एंटलर्स' डायमंड इअर कफ्स हे कला आणि सौंदर्याचा एक अजोड नमुना आहेत. सोन्याची सुबक बनावट आणि चमकणाऱ्या हिऱ्यांपासून बनवलेले हे इअर कफ्स तुमच्या कानांवर अतिशय मोहक दिसतात.'स्लीक फॅन्सी डायमंड इअर कफ्स' हे सिद्ध करतात की साधेपणा सुद्धा एक प्रभावी स्टाईल स्टेटमेंट असू शकतो. सोन्याच्या नाजूक आणि सुबक लहरी तुमच्या कानांवर सहजपणे विसावतात.'युनिक नेचर' डायमंड इअर कफ्स सौंदर्याला त्याच्या सर्वात नैसर्गिक रूपात जपतात. निसर्गातील सुंदर आकारांपासून प्रेरणा घेतलेले, यांचे प्रत्येक वळण सोन्याच्या फांदीवर पडलेल्या दवबिंदूंप्रमाणे चमकते.

# विद्यामंदिर इंग्लिश स्कूलमध्ये जिजाऊ -सावित्री- विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**मारुती सत्रे :** माजलगाव दि.१३ प्रतिनिधी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील विद्यामंदिर इंग्लिश स्कूलमध्ये मॉसाहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजनाने उत्सवाची सुरुवात करण्यात आली.

जयंती उत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार प्रकाश काशिद यांची उपस्थिती होती. आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष कवी संजय सपाटे, संस्थाध्यक्ष बळीराम पारेकर, मंगलनाथ मल्टीस्टेटचे व्यवस्थापक ओमकार काटकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या स्वागतानंतर मुख्याध्यापक



बळीराम पारेकर सर यांनी प्रास्ताविक केले. जयंती उत्सव कार्यक्रमांमध्ये बालकांची फॅन्सी ड्रेसेस स्पर्धा घेण्यात आली. बाल विद्यार्थ्यांनी राजमाता मासाहेब जिजाऊ, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, छत्रपती शिवाजी महाराज, ए पी जे कलाम आदी महापुरुष व महामाता यांच्या वेशभूषातून फॅन्सी ड्रेसेस स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. सदर बालकांनी वेशभूषेतील पात्रान्वये ब्रीदवाक्य, घोषवाक्य व्यक्त केले, यावेळी संजिवनीमल्टीस्टेटचे व्यवस्थापक संजय सपाटे यांनी शाळेच्या विद्यामंदिर नावावरून सकारात्मक विचार व्यक्त केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा अँकर प्रकाश काशिद यांनी अध्यक्षीय समारोप भाषणात राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई व स्वामी विवेकानंद यांच्या विचारावर व कार्यावर प्रकाश टाकला. साक्षी पांचाळ ने सूत्रसंचालन केले तर मोहिनी सोळंके मॅडमने आभार मानले. यावेळी घेण्यात आलेल्या फॅन्सी ड्रेस स्पर्धेत मोठ्या गटातून रुही बडे, रुद्रायणी क्षीरसागर, रितेश केंद्रे,सार्थक बडे तर छोट्या गटातून अवनी बडे, मैथिली शेंडगे, त्रिशा पारेकर ही बाल स्पर्धकं विजयी झाले आहेत. या कार्यक्रमासाठी सौ.रेणुका पारेकर, मोहिनी कटारे,मोहिनी सोळंके,शारदा वनवे, पांचाळ, गणेश जाधव, गोपाळ कटारे यांनी परिश्रम घेतले.

### खांदा वसाहतीच्या विकासासाठी तरुण पिढी सक्रिय

# प्रभाग क्रमांक १५ मधील चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने होणार विजयी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून प्रभाग क्रमांक १५ मध्ये मोठ्या प्रमाणात तरुण पिढी प्रचारात सहभागी झाल्याने येथील चारही भाजप उमेदवारांचा विजय निश्चित मानला जात आहे.

या प्रभागातून ज्येष्ठ नगरसेवक एकनाथ गायकवाड, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेविका कुसुम पाटील व युवा नेतृत्व म्हणून दशरथ म्हात्रे हे या निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रभागात मोठ्या प्रमाणात विकास कामे झाली असून येथील रस्त्यांचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न, नाल्याचा प्रश्न या पूर्वीच नगरसेवकांनी सोडवला आहे. तर येणाऱ्या काळात खांदेश्वर




मंदिराजवळील तलावाचे सुशोभीकरण तसेच त्या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी येणाऱ्या नागरिकांसाठी बॅडमिंटन कोर्ट उभारणे, खांदा वसाहतीचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी विविध योजना उपक्रम या ठिकाणी राबवणार असे उमेदवार दशरथ म्हात्रे यांनी यावेळी सांगतले आहे. या मतदार संघात मोठ्या प्रमाणात तरुणांची फळी प्रचारासाठी रस्त्यावर उतरली आहे. त्यामुळे प्रचाराला एक वेगळी रंगत आली आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रसह्नत ठाकूर, अरुणशेठ भगत यांनी मोठ्या विश्वासाने मला ही निवडणूक लढण्याची संधी दिली आहे. या संधीचे मी सोने करणार असून यापूर्वी सुद्धा मी सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत होतो. पक्षाच्या विविध पदांमार्फत मी खांदा वसाहतीच्या लोकांसाठी कामे केली आहेत. त्या मतदारांना मी घरचा उमेदवार वाटत आहे;. त्याच प्रमाणे माझ्या बरोबर असणारे तीनही उमेदवार हे अनुभवी असल्यामुळे त्यांच्या कार्याचा फायदा आम्हाला या निवडणुकीत निश्चितच होणार आहे. त्यामुळे येत्या १५ तारखेला मतदार राजाने मतदानासाठी यावे व चारही उमेदवारांसमोरील कमळाचे बटन दाबून आम्हाला विजयी करावे असे आवाहन प्रभाग क्रमांक १५ चे उमेदवार दशरथ म्हात्रे यांनी केले आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची गोंडवाना पिंपरी येथे छापा टाकून धडक कारवाई

- बनावट देशी - विदेशी दारुचा कारखाना होता सुरु
- 1 हजार 90 लिटर देशी दारुचा बनावट ब्लेंड जप्त

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी/नागपूर :** राज्य उत्पादन शुल्क नागपूर विभागाचे विभागीय उपायुक्त गणेश पाटील व जिल्हा अधीक्षक सुरज कुमार रामोड यांच्या मार्गदर्शनाखालील विभागीय भरारी पथकाने गोंडवाना पिंपरी, हिंगणा येथील माय टाऊन सोसायटी, सेक्टर-8 येथील बंगलो क्रमांक 133 येथे नुकताच छापा टाकून बनावट देशी-विदेशी दारुच्या कारखान्याला टाळे ठोकले. घटनास्थळावरुन 1 हजार 90 लिटर देशी दारुचा बनावट ब्लेंड, महाराष्ट्रात विक्रीस प्रतिबंधीत असलेल्या गोवा व्हीस्कीच्या 356 बाटल्या, 90 बिएल बनावट देशी दारु, इलेक्ट्रानिक बॉटल सिलींग मशिन बनावट रॉकेट देशी दारु नावाचे कागदी लेबल, जीवंत पत्रीबुचे, रिकाम्या बाटल्या, बनावट रॉयल स्टग विदेशी दारुचे जीवंत प्लॉस्टीक जीवंत बुचे, चारचाकी वाहन असे एकूण 24 लाख 67 हजार 704 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यत आला.

या गुन्हा क्रमांक 19/2026 अन्वये शुभम गोविंद तिवारी वयवर्ष 31 ( फरार मुख्य आरोपी ), गोविंद रामदत्त तिवारी वयवर्ष 59, शैलेंद्र धुर्वे वय वर्ष 24, रघुनाथ उईके वयवर्ष 21, राजकुमार उईके वयवर्ष 25, द्वारका शिवलाल इनवाती वयवर्ष 45 व प्रमोद नथ्थुजी सयाम वयवर्ष 42 या आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई विभागीय भरारी पथकाचे निरीक्षक दशरथ क्षीरसागर, दुय्यम निरीक्षक जगदीश पवार, लांबाडे, निरीक्षक बालाजी



चाळणेवार, दुय्यम निरीक्षक वैभव दीवाण, अमित क्षीरसागर, शुभम ढोके यांनी या कारवाईत सहकार्य केले. जवान सर्वश्री राहुल सपकाळ, गजानन राठोड, सुधीर मानकर, किरण वैद्य, सचिन आडोळे, विनोद डुंबरे यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. सदरील गुन्ह्याचा पुढील तपास दुय्यम निरीक्षक जगदीश पवार विभागीय भरारी पथक, नागपूर हे करीत आहेत. अवैध मद्य निर्मिती, विक्री, वाहतूक या संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास टोल फ्रि क्रमांक 18002339999 व व्हॉटस्ॲप क्रमांक 8422001133 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाने केले आहे.

# "तिळगुळ आणि हळदी - कुंकू : एक सुंदर परंपरा"

भारतीय सणपरंपरेत मकरसंक्रांतीला विशेष महत्त्व आहे. सूर्य मकर राशीत प्रवेश करतो त्या क्षणाला मकरसंक्रांती म्हणतात. हा सण केवळ धार्मिक नाही, तर निसर्गाशी, समाजाशी आणि माणसाच्या अंतर्मनाशी नाते जोडणारा आहे.

संक्रांती म्हणजे परिवर्तन. सूर्य उत्तरायण होतो, दिवस मोठे होऊ लागतात, थंडीची कडाका कमी होतो आणि नवीन ऋतूची चाहूल लागते. जशी निसर्गात बदलाची सुरुवात होते, तशीच माणसानेही आपल्या जीवनातील नकारात्मकता मागे टाकून सकारात्मकतेकडे वळावे, हा संदेश संक्रांती देते.

भारतीय संस्कृती ही ग्रंथांतून नव्हे, तर स्त्रियांच्या जगण्यातून पिढ्यानपिढ्या पुढे गेली आहे. सण, परंपरा, नातेसंबंध आणि मूल्ये—या साऱ्यांची मूक पण मजबूत वाहक स्त्रीच आहे. मकरसंक्रांती हा सण त्याचेच जिवंत उदाहरण ठरतो.

संक्रांतीच्या पहाटेपासून घराघरांत सुरू होणारी तयारी म्हणजे स्त्रीच्या श्रमांची आणि प्रेमाची सुंदर गुंफण असते. तिळगुळाचे लाडू हातात वळताना, चुलीवरून येणारा गुळाचा सुगंध आणि अंगणात रांगोळी काढताना उमटणारे रंग—या साऱ्यांतून फक्त सण नव्हे, तर स्त्रीच्या भावनांचा स्पर्श जाणवतो. ही तयारी केवळ पदार्थांची नसते; ती नात्यांची, आठवणींची आणि संस्कारांची असते.

हळदी-कुंकू हा संक्रांतीचा आत्मा आहे. या छोट्याशा विधीतून स्त्रियांना सन्मान, आपुलकी आणि एकमेकांशी जोडणारा संवाद मिळतो. तिळगुळ देताना उच्चारले जाणारे "तिळगुळ घ्या, गोड गोड बोला" हे शब्द स्त्रीच्या आयुष्यातील अनेक न बोललेल्या दुःखांवर जणू गोड फुंकर घालतात. संसाराच्या जबाबदाऱ्यांत झिजलेली स्त्री या दिवशी क्षणभर तरी स्वतःसाठी जगते.

घर, कुटुंब आणि समाज यांच्यात समतोल साधत महिलांनी संस्कृती जपली आहे. बदलत्या काळात भूमिका बदलल्या, जबाबदाऱ्या वाढल्या; पण सणांचे मोल, नात्यांची वीण आणि संस्कारांची शिदोरी आजही स्त्रीच पुढे नेत आहे. मुलांच्या मनात सणांचे संस्कार रुजवताना, स्त्री नकळत संस्कृतीचे बीज पेरत असते.

संक्रांत आली की स्त्रियांच्या जगण्यात एक वेगळीच लगबग दिसते. घरात तिळगुळाचे



पदार्थ तयार होत असतानाच, मनात हळदी-कुंकूची यादी सुरू होते—कोणाला बोलवायचं, काय द्यायचं आणि "यावेळी काहीतरी वेगळं" काय करायचं! हा समारंभ केवळ धार्मिक विधी नसून, स्त्रियांच्या सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

हळदी-कुंकू म्हणजे स्त्रीचा सन्मान. काही क्षणांसाठी का होईना, संसार, काम आणि जबाबदाऱ्यांपासून थोडी विश्रांती देणारा हा सोहळा आहे. येथे फक्त हळद-कुंकूच नाही, तर हसू, बोलणं, अनुभवांची देवाणघेवाण आणि आपुलकीही वाटली जाते. "तिळगुळ घ्या, गोड गोड बोला" या वाक्यातून अनेकदा मनातली कटुता गोडव्यात विरघळते.

या समारंभात थोडासा विनोदही असतो. भेटवस्तू पाहून "हे गेल्या वर्षीसारखंच आहे" अशी कुजबुज, किंवा "यंदा तरी उपयोगी आहे" अशी मनातली टिपण्णी—या सगळ्यातून स्त्रियांची सहज, मोकळी वृत्ती दिसते. मात्र या हलक्याफुलक्या बोलण्यातही नात्यांचा धागा घट्ट राहतो.

बदलत्या काळात हळदी-कुंकूचे स्वरूप बदलले असले, तरी त्यामागील भावना अजूनही तशीच आहे. आजही हा समारंभ स्त्रियांना एकत्र आणतो, संवाद घडवतो आणि सामाजिक एकोप्याला बळ देतो. सणाच्या निमित्ताने स्त्री-स्त्री नात्यांना मिळणारी ही ऊब समाजासाठी मोलाची आहे.

संक्रांत आणि हळदी-कुंकू समारंभ आपल्याला सांगतात की परंपरा म्हणजे केवळ रीतिरिवाज नव्हेत, तर माणसांना जोडणारी भावना आहे. गोड बोलणं, सन्मान देणं आणि नाती जपणं—हेच या सणाचं खरे सौंदर्य आहे.

संक्रांत आणि हळदी-कुंकू समारंभ आपल्याला फक्त सणाचे आनंददायी क्षण नव्हे, तर जीवनातील नात्यांचा, संस्कारांचा आणि माणुसकीचा गोडवा शिकवतात. स्त्रिया आपल्या मेहनतीतून आणि प्रेमातून या परंपरेला जिवंत ठेवतात. "तिळगुळ घ्या, गोड गोड बोला" हे शब्द कटुता विसरून गोड संवाद साधण्याचा, नाती जपण्याचा आणि जीवनाला गोडवा देण्याचा संदेश देतात. या सणातून समजते की खरा आनंद घराघरातील गोड बोलण्यात, आठवणींमध्ये आणि आपुलकीत दडलेला आहे.

**(नम्रता स्वरूप घोडके )**

